# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११८**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • १९३५ • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ७ / जून २००७

## संपादकीय


### प्रवेश

जून जुले महिन्यांचे दिवस आणि शाळा महाविद्यालयांमधील प्रवेशांची गडबड हे नित्याचे झाले आहे. या प्रवेशासंबंधात अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नां वर तात्पुरती डागडुजी करून वर्ष सुरू होतं आणि विषय नजरेआड जातो.

गेल्या वीस पंचवीस वर्षांत सर्वच उपनगरांमध्ये विविध शाखांची आणि व्यावसायिक शिक्षणाची महाविद्यालये मोठ्या प्रमाणात निघाली. तरीही 'अनेक पालक अमूकच एका महाविद्यालयात प्रवेश हवा' असा आग्रह बाळगतात. हा आग्रह समजण्यापलीकडचा आहे. नॅकसारख्या संस्थांनी दिलेला दर्जा हा महत्त्वाचा निकष असला तरी आपापल्या उपनगरात प्रवेश घेऊन, तेथे असणारी शिक्षणाची तरतुद वृद्धिंगत करून त्या महाविद्यालयांचा दर्जा सुधारणे हे पालकांचे, समाजाचे काम आहे. दूरवरच्या महाविद्यालयांत प्रवेश घेणे म्हणजे अनेक अडचणी आपणच निर्माण करणे आहे. एक काळ होता, ठाण्याकडची मुले महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईत जात. अपवाद, वगळता, बरीच मुले जिवाची मुंबई करण्यात रमत. पण आज शिक्षणाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी बदलली आहे. शैक्षणिक संस्थांचा दर्जा ही संकल्पना ही बदलत आहे. अशा वेळी घरापासून जवळ असणाऱ्या महाविद्यालयांत प्रवेश घेणे हेच शहाणपणाचे आहे. 'ठरावीक महाविद्यालयाचा आग्रह' त्यासाठी सोडायला हवा.

व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क हा एक नेहमी चर्चेत असलेला, न्यायालयापर्यंत नेला जाणारा प्रश्न असतो. आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, संबंधित संस्थेने सर्व पायाभूत सोयी सुविधा द्याव्यात असे पालकांना वाटत असते. यात गैरही नाही. मात्र सर्वत्र होणारी भाव वाढ लक्षात घेऊन, ती अटळ आहे असे मानणारे पालक शिक्षण शुल्काचा मात्र प्रश्न करतात, त्याला राजकीय रंग देतात. एक तर, उद्योगधंद्यात शासनाने लागू केलेली विनापरवाना पद्धत या क्षेत्राला लागू करायला हवी तरच व्यावसायिक शिक्षणाचा विकास शक्य आहे. शिक्षणसंस्थेला करावी लागणारी प्रचंड गुंतवणूक, चांगले अध्यापन हवे असेल तर शिक्षकांना द्यावे लागणारे वेतन, दैनंदिन खर्च इ. बाबी लक्षात घेतल्या जात नाहीत; किंबहुना अनेक, अनावश्यक बाबींमध्ये.शासन लुडबुड करते व मग प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात होते! शुल्काचा प्रश्न आला की आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांचे प्रश्न पुढे करण्याची आपली सवय आहे.

( पृष्ठ क्रमांक ४० पहा )



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ७ / जून २००७

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक १२ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | एक अविस्मरणीय प्रसंग<br>"मुंबईच्या महासागरात आईचे हरविणे" | श्री. भा. आ. पांडे | ३ |
| २) | सूर्य देवता विषयक माहिती<br>(लेखांक पहिला) | श्री. शं.बा.मठ | ७ |
| ३) | नामस्मरण - नाम श्रेष्ठ ! की स्मरण ! | श्रीमती आशा भिडे | १२ |
| ४) | 'कागद विरहित ग्रंथालये' | श्री. योगानंद दादाजी अहिराव | १७ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २१ |
| ६) | ब्रह्मचर्य - एक वरेण्य तत्त्व | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ३२ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

एक अविस्मरणीय प्रसंग

# ''मुंबईच्या महासागरात आईचे हरविणे''

*ज्येष्ठ नागरिक महासंघाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील प्रथम पारितोषिक प्राप्त निबंध मानकरी स्मरणिकेच्या सौजन्याने येथे देत आहोत. दिशाचे कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक हे या स्पर्धेचे परीक्षक होते. - संपादक*

मानवी जीवन मोठं विचित्र आहे. सामान्य पापभीरु माणसाच्या जीवनात कधीकधी एखादा प्रसंग अवचितपणे येतो व वादळ निर्माण करतो. त्यावेळी त्याची सारासार बुद्धी कामच करीत नाही. आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर मन हेलकावे खात असताना "नियती" व "परमेश्वरावर" हवाला ठेवूनच या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी तो आक्रंदत राहतो - अगदी हे वादळ शमेपर्यंत! माझ्या एरवी संथ आयुष्यात नोव्हें. १९७२ मध्ये आई हरविण्याची घटना आकस्मिकपणे घडली व माझ्या आयुष्यात ती वादळ निर्माण करून गेली.

मंत्रालयात १९६६ मध्ये सेवेत असताना, विक्रोळी येथील कन्नमवार नगर-२ मध्ये मला गृहनिर्माण विभागाच्या वसाहतीत १४२ क्र. च्या इमारतीत सदनिका क्र. ४२३४ शासनाने मंजूर केली होती. १९७० च्या ऑक्टो. मध्ये मी सपत्निक या वसाहतीत राहण्यास आलो होतो. विक्रोळीचा (पूर्व) हा भाग त्यावेळी नुकताच विकसित होत होता. खाडी बुजवून कन्नमवार नगर-१ च्या खाडीकडील भागात व कन्नमवार नगर-२ मधील भागात गृहनिर्माण मंडळातर्फे बरीच बांधकामे सुरू होती. एकसारख्या आकाराच्या या इमारती होत्या. पण कन्नमवार नगर- १ ते २ मधील कच्च्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूला खारफुटी वनस्पती होत्या. रस्त्यावर दिवे नव्हते. विक्रोळी स्टेशनवरुन टॅक्सी वा ऑटोरिक्षा कन्नमवार नगर -२ मध्ये अभावानेच येत. त्यामुळे कार्यालयातून रात्री उशीरा घरी येताना किंवा काही कार्यक्रमासाठी कुठे गेलो असता, घरी येताना जीव मुठीत घेऊनच या मार्गाने यावे लागे.

माझे लग्न नुकतेच झाले होते. दिवाळीसाठी माझे आई-वडील ऑक्टो. १९७२ मध्ये आले होते. ते ग्रामीण जीवनात वावरले असल्याने मुंबईचे धावपळीचे जीवन व नवीन वस्तीत त्यांना बुजल्यासारखे वाटणे स्वाभाविकच होते. माझी आई थोडी वेडसर होती व अशिक्षितही होती. पण भजनपूजन, देवपूजा, देवदर्शन यात तिला खूपच रस होता. कन्नमवार नगर- २ मध्ये एकही मंदिर नव्हते. टागोरनगर मधील विक्रोळी स्टेशनकडील रस्त्यावरील देवीच्या मंदिरात मी त्यांना एक दोनदा पूर्वी घेऊन गेलो होतो.

नुकतीच दिवाळी संपून कार्तिक शुद्ध चतुर्दशी म्हणजे वैकुंठ चतुर्दशी जवळ येत चालली होती. धकाधकीच्या जीवनात बाहेर कुठे जाणे जमत नव्हते. पत्नीलाही मुंबई नवीनच होती. त्यामुळे २० नोव्हें. १९७२ च्या संध्याकाळी त्या दिवशी शनिवार असल्याने मंत्रालया शेजारील नवीन बांधलेल्या "आकाशवाणी थेटर" मध्ये लागलेल्या 'एक अधुरी कहाणी' हा कलात्मक चित्रपट सपत्निक पाहण्याचे आम्ही ठरविले होते. त्यादिवशी वैकुंठ चतुर्दशी असल्याने देवीच्या दर्शनासाठी जाण्याची आई-वडिलांची इच्छा होती. तथापि आमचा कार्यक्रम ठरला असल्याने आज संध्याकाळी न जाता, आपण सर्व देवीच्या दर्शनाला उद्या दि. २१ नोव्हें. रोजी रविवारी संध्याकाळी जाऊ, असे त्यांना सांगून मी २० नोव्हें. ला सकाळी ऑफिसमध्ये गेलो. पत्नीला मी संध्याकाळी ६.०० पर्यंत

"आकाशवाणी थेटर" जवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे ती आली व आम्ही "एक अधुरी कहाणी" चित्रपटास गेलो.

विनाशकाले विपरित बुध्दी म्हणतात, त्यानुसार आई-वडिलांना मी आम्ही येईतो कुठे जाऊ नका, उद्या संध्याकाळी दर्शनास जाऊ असे बजावले असतानाही, सूनबाई घरुन गेल्यानंतर माझ्या आई-वडिलांनीही आजच देवदर्शन करुन येण्याचे ठरविले व ओटीचे तांदूळ, हळद-कुंकू, सुटी नाणी वगैर घेऊन ते दोघे टागोरनगरमधील देवीच्या दर्शनास जाण्यासाठी बाहेर पडले. कन्नमवार नगर १ जवळून हायवे क्रॉस करुन टागोरनगर मधील मंदिरात गेले, दर्शन घेतले. परतीच्या प्रवासात हायवे क्रॉस करुन कन्नमवार नगर १ व २ च्या फाट्यावर आले असताना समोरुन येणाऱ्या टॅक्सीच्या फ्लड लाईटमुळे वडिलांचे डोळे दिपले. क्षणभर त्यांना काहीच दिसेना. तसेही संध्याकाळनंतर त्यांना कमीच दिसत होते. तरीही ते तसेच घराच्या दिशेने पुढे चालू लागले. मागून आई येत आहे की नाही त्यांनी पाहिले नाही. घरी पोहचताच मागे वळून पाहिले तर माझी आई नाही, आता येईल मग येईल या विचाराने त्यांनी अर्धा तास वाट पाहिली. तोवर रात्रीचे आठ वाजले होते. त्यानंतर शेजाऱ्यांचे कानावर त्यांनी त्याबाबत सांगितल्यावर ३-४ जण कन्नमवार नगर १, डावीकडून पायवाटेने कन्नमवार नगर २ मार्केट असे फिरुन शोध घेऊन आले. पण माझ्या आईचा शोध लागला नाही.

'एक अधुरी कहाणी' सिनेमा पाहून आम्ही रात्री ९.४५ वाजता घरी पोहोचलो. बाजूला शेजारी कुजबुजत होते व घरात वडील डोक्याला हात लावून बसले होते. मला पहाताच त्यांनी झालेला प्रकार सांगून आईला शोधण्यासाठी त्वरित जाण्यास सांगितले. आईचे वय ६५ वर्षे असल्याने ती फार लांब जाण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे पुन्हा शेजारचे फडणीस, दिवेकर, गेडाम, खांडेपारकर, नलावडे, महाडिक इ. मित्रांसह / शेजाऱ्यांसह हा परिसर २ तास पिंजून काढला. परंतु आईचा शोध लागला नाही. ती कुठे असेल, थंडीत तिचे हाल होतील या विचाराने रात्रभर डोळ्यास डोळा लागला नाही.

२१ नोव्हें. च्या सकाळी पुन्हा शोध घेतला. कन्नमवार नगर १ च्या डावीकडील रस्त्याचे खाडीकडील भागातील एका धान्य-गिरणीत ती रात्री झोपली होती व सकाळी गेली असे तेथील नोकराने सांगितल. नंतर कन्नमवार नगर २ मधील मार्केटमधील एका टॅक्सी ड्रायव्हरने एक म्हातारी 'आपले घर सापडत नाही - घरी पोचवून द्या' अशी विनवणी करीत होती. तिला आपण घर नंबर विचारला असता तिने 'नऊ' नंबर सांगितल्याने तिची दया येऊन आपण तिला टॅक्सीने गोदरेज कॉलनीकडील इमारत क्र. ९ जवळ सोडल्याचे त्याने सांगितले. तिकडे जाऊन शोध घेतला. पण शोध न लागल्याने शेवटी विक्रोळी पोलीस स्टेशनला 'आई हरविल्याची तक्रार' नोंदविली.

२२ नोव्हें. ला वडील बंधू अमरावतीहून आले. दोघांनी पुन्हा शोध घेतला, पण तिचा पत्ता लागला नाही. विक्रोळी रेल्वे स्टेशन, टागोरनगर मधील देवीचे मंदिर, कन्नमवार नगर १ व २ मध्ये तिचे वर्णन देऊन हरविल्याचे वृत्त देऊन घरी घेऊन येणाऱ्यास भरघोस बक्षीस देण्याचे बोर्डही लावले. आमच्या इमारतीतील नवाकाळचे वार्ताहार श्री. बाळासाहेब पुरंदरे व शेजारच्या इमारतीतील लोकसत्ताचे वार्ताहरही पोलिसांवर आईचा लवकर शोध घेण्यासाठी दबाव आणीत होते. श्री. बेलवलकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे त्यांचे परीने चौकशीत सहकार्य देत होते. परंतु, माझ्या आईला घरचा पत्ता, माझ्या ऑफिसचा पत्ता वगैरे सांगता येत नसल्याने तपासात प्रगती होत नव्हती.

मोठ्या बंधुंची सुट्टी संपल्याने ते परत गेले. २-३ दिवस तपास कार्यात साथ देणारे शेजारीही आपल्या व्यवहारात मग्न झाले होते. वृत्तपत्रात आईच्या हरविल्याचे

फोटोसह वृत्त देऊनही ५-६ दिवस झाले होते पण आईचा शोध लागला नाही. 'जन पळभर म्हणतील हाय हाय' म्हणीची सार्थता पटायला लागली होती. कार्यालयामार्फत, पोलीस कंट्रोलमार्फतही आईच्या शोधा संदर्भात सहकार्य मिळत होते, पण आई सापडली नव्हती.

आईला हरवून ८ दिवस झाल्याने आता वडिलांचाही धीर खचला व 'माझ्यामुळेच तुझी आई हरवली' असा आक्रोश करुन ते रडू लागले होते. त्यांनाही सावरावे लागत होते.

त्याचवेळी अकोल्याला तहसिलदार असलेले माझे सासरे एक आठवड्याची रजा काढून मुंबईला आले. पुन्हा शोधार्थ सुरु केले. 'मन चिंती ते वैरी ही न चिंती' या म्हणीनुसार आईचे बरे वाईट झाले असेल, तिला हायवेवर अपघात झाला असेल, खाडीत पडली असेल, या सर्व पर्यायांचा विचार करुन मुंबईतील महत्त्वाची इस्पीतळे, प्रेतगृहे यांतही शोध घेतला. जे. जे. इस्पीतळातील प्रेतगृहातील प्रेते पाहून तर मला चक्करच आली. अतिशय जीवघेणा अनुभव होता तो. यातूनही काही निष्पन्न झाले नाही.

अंधश्रद्धा, बुवाबाजी, गंडेदोरे यावर माझा विश्वास नव्हता, नाही. पण सारासार बुद्धी चालत नसल्याने व आईचा शोध लागलाच पाहिजे या जाणिवेने दादर मधील श्री. मुंज ज्योतिषी, भायखळ्यातील अल्लाबक्ष , मुलुंडच्या नरसिंह सरस्वती खाजगी मठातील वैद्य गुरुजी वगैरेकडेही गेलो. सर्वांनी तुझी आई जिवंत आहे पण तिची सद्य प्रकृती घरापासून लांब जाण्याची आहे. तिला घराची ओढ लागावी म्हणून सकाळ संध्याकाळ अंगारा फुंकावा, कुलदेवतेचा कोप आहे, आई सापडल्यावर दर्शनास घेऊन येण्याचा नवस करावा वगैरे सांगितले. त्याप्रमाणेही करुन झाले. वृत्तपत्रातील बातमी संदर्भात एक दोघांनी दिलेल्या वर्णनाची एक म्हातारी सापडलयाचा निरोप दिला. तेथे गेल्यावर ती माझी आई नसल्याचे दिसून आले. मला शोधायला रेल्वे स्टेशनकडे गेली असेल व लोकलमध्ये कुठे गेली असेल असे वाटून आम्ही पती-पत्नींनी कांजूरमार्ग, ठाणे, टिटवाळा, अंबरनाथ, बदलापूर पर्यंतच्या रेल्वे स्टेशनावरही शोध घेतला पण तिचा शोध लागला नाही. पण ती मिळेल असा विश्वास मात्र वाटायला लागला होता.

अतिशय विमनस्क मन:स्थितीत असताना पुन्हा आईच्या हरविल्याचे फोटोसह वृत्त लोकसत्तेत देण्याचा मनात विचार आला व त्यानुसार दि. ५ डिसेंबर १९७२ च्या लोकसत्तात वृत्त छापून आले.

सकाळी ११ - ११.३० चा सुमार असेल. विक्रोळी पोलीस स्टेशनमधून श्री. वेलवलकरांनी निरोप पाठविला की, "तुमची आई सापडली आहे असे वाटते, तुम्ही माटुंगा पोलीस स्टेशनमध्ये जाऊन खातरजमा करुन घ्या." मी व माझे सासरे मिळून तडक टॅक्सीने माटुंगा पोलीस स्टेशन गाठले. तिथे एका बाकावर खरोखरच माझी आई बसलेली दिसली. मला पाहताच ती माझ्याकडे झेपावली व माझ्या कंबरेला मिठी मारुन ओक्साबोक्सी रडत 'भास्कर मला लगेच घरी घेऊन चल' म्हणाली. माझ्या, माझ्या सासऱ्यांच्या व पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांच्या डोळ्यातूनही अश्रुधारा वहात होत्या. विहित सोपस्कार पूर्ण करुन आम्ही विक्रोळीला टॅक्सीतून आलो. संपूर्ण प्रवासात ती मला घट्ट बिलगून बसली होती. घरी आल्यावर गरम पाण्याने आंघोळ करुन तिने देवाला व वडिलांना नमस्कार केला. घर कसे आनंदाने भरुन आले होते. शेजारी पाजारी, पोलीस स्टेशनमधील अधिकारी यांना पेढे देऊन त्यांचे तोंड गोड केले. वैद्यकीय तपासणी केली असता, तिला काहीही झाले नसल्याचे दिसून आले. तिला 'तू कुठे होतीस, काय खाल्ले प्याले' विचारणा केली असता 'पांडुरंगाने मला वाचविले' यापेक्षा ती जास्त काही सांगू शकली नाही.

अधिक चौकशीत माटुंगा पोलीस स्टेशनला ॲटॅच असलेला कदम नावाचा पोलिस शिपाई 'रावली कॅम्प' भागातून ड्युटीवर 'लोकसत्ता' वाचत जात असताना आईचा फोटो त्याने पाहण्याची व त्याच वेळी समोरून आई येण्याची एकच गाठ पडली. त्याने लगेच तिचा हात धरुन 'या बातमीतील भास्कर पांडे कोण?' विचारणा करताच तिने मला माझे घर, माणसे सापडत नाहीत. मला भास्करकडे पोहचवून द्या अशी विनवणी केली होती. त्याने टॅक्सीने तिला माटुंगा पोलीस स्टेशनला आणले होते. व विक्रोळीच्या बेलवलकरांना निरोप दिला होता.

माझ्या शोधार्थ ती हावबेने चेंबूर नाक्यावरुन रावळी कॅम्पपर्यंत गेली होती. श्री. कदम यांना मी भरघोस बक्षीस देऊ केले पण त्याने नम्रपणे ते नाकारुन तुमची आई सापडली यातच मला समाधान मिळल्याने सांगितले. नंतर १५ दिवसांनी आई-वडिलांना गाणगापूर-पंढरपूरला दर्शनासाठी घेऊन गेलो

त्यानंतर १६ वर्षांनी माझी आई वारली. आज ती या जगात नाही. "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी म्हणतात" तसा मी तिच्या प्रेमाचा भिकारीच झालो आहे. ही घटना माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग आहे. आजही रेल्वे / बसने विक्रोळीहून जात येत असताना ती घटना आठवून मन कासावीस होते व तो प्रसंग डोळ्यापुढे हेलकावत राहतो.

**श्री. भा. आ. पांडे**
श्रीनगर ज्येष्ठ नागरीक संघ, ठाणे

•••

## ज्येष्ठ नागरिकांसाठी

*आपण आयुष्यात बरेच उन्हाळे पावसाळे पाहिलेत. खूप बरे वाईट अनुभव घेतले. खूप सोसले आयुष्यभर खस्ता खाल्ल्या.*

*आता आपल्या वृद्धापकाळी या क्षणांच्या आठवणी कोणला तरी सांगाव्यात असे आपणांस वाटत असते. श्री. भास्करराव पांडे यांचा लेख वाचल्यानंतर आपल्या सर्वांना आवाहन करावेस वाटते की, आपण दिशाकडे हे अनुभव पाठवा. आपले अनुभव गद्य व विचार देणारेच असावेत ही मात्र अपेक्षा ! तेव्हा आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहोत.*

संपादक

<u>दिशा</u>

प्रकाशनास होत असलेल्या विलंबामुळे आम्ही दिलगीर आहोत.

- संपादक

# सूर्य देवता विषयक माहिती
## (लेखांक पहिला)

*श्री. शंकरराव मठांनी खास दिशासाठी संशोधन करून व तयार केलेला हा लेख मालिकेतील हा पहिला लेख - संपादक*

**सूर्य वर्णन :-**

वेद व पुराणे यांतील वर्णनावरुन सूर्यदेव सर्व स्थानी व सर्व जीव जगत् तसेच चराचराचा आत्मा आहे. अखिल सृष्टीचा तो आदिकारण आहे. ऋग्वेदात या संबंधीचे स्पष्ट उल्लेख आहेत. 'सूर्य आत्मा जगतः तस्थुतश्च ।' (ऋ. १-११५-१) सूर्य हा समस्त ब्रह्माण्डाचा विराट पुरुष मानला जातो. यालाच वैश्वानर अशी संज्ञा आहे. हा वैश्वानर सर्व व्यापी आहे. त्रैलोक्यातील कणन् कण याने प्रभावित झाले आहे. या वैश्वानराचं वा विराट पुरुषाचे वर्णन वेदातून असे आढळते. याला हजारो डोकी आहेत, हजारो पाय आहेत, हा समस्त ब्रह्मांड व्यापून दहा अंगुले राहिला आहे. 'सहस्त्रशीर्षा पुरुषः। सहस्त्राक्षः सहस्त्रपात्। सभूमिं विश्वतोवृत्वा। अत्यतिष्ठत् दशाङगुलम्। (ऋ. ग. १०-९२) कालांतराने या वैश्वानरालाच सूर्य म्हणण्यात येऊ लागले.

ही सर्वसामान्य गोष्ट आहे की सूर्य ही सर्वातअधिक प्रतापी, प्रभावशाली प्रत्यक्ष व सर्वस्पर्शी देवता आहे. युगायुगात त्याची महती अक्षुण्ण राहिली आहे. आजही समर्थ, शक्तिसंपन्न, सर्वपोषक, जीवनप्रदाता, तिमिरनाशक आणि अजेय अशीच त्याची जनमानसात प्रतिमा आहे. वस्तुतः त्रिमूर्ती या सूर्य देवतेत समाविष्ट आहेत. थोडक्यात ब्रह्मा, विष्णु, महेश यांचे हा संयुक्त रूप आहे. 'उदये ब्रह्मणोरूपं मध्यान्हे तु महेश्वरः । अस्तमाने स्वयं विष्णुः त्रिमूर्तिःयः दिवाकरः।' थोडक्यात उत्पत्ति, स्थिती, लय या गोष्टी सूर्य रूपात दृष्टोत्पत्तीस पडतात.

**सूर्य देवताचा महिमा :-**

श्री कृष्णाने आपला नातू सांब याला सूर्यासंबंधी माहिती दिली, असा भविष्य पुराणात उल्लेख आहे. ते श्लोक व त्याचे मराठीत रूपांतर उद्धृत केले आहे.

प्रत्यक्षं देवता सूर्यो जगत् चक्षुः दिवाकरः ।
तस्मात् अभ्यधिका काचित् देवता नास्ति शाश्वती ।

यस्मात् इदं जगत् जातं लयं यास्यति यत्र च ।
कृतादि लक्ष्मणः कालः स्मृतः साक्षात् दिवाकरः।

ग्रह नक्षत्र योगाश्च राशयः करणादि च ।
आदित्य वसवो रूद्रा अश्विनी वायवोऽनलः।

शक्रः प्रजापतिः सर्वे भूः भुवः स्वः तथैव च ।
लोकाः सर्वे नगाः नागाः सरितः सागरस्तथा।

भूत ग्रामस्य सूर्यस्य स्वयं हेतुः दिवाकरः ।
अस्य इच्छया जगत् सर्वं उत्पन्नं सचराचरम् ।

स्थितं प्रवर्तते चैव स्वार्थे चानु प्रवर्तते ।
प्रसादात् अस्य लोकोऽयं चेष्टमानः प्रदृश्यते।

अस्मिन् अभ्युदिते सर्वं उदेत् अस्तमिते सति।
तस्मात् अतः परं नास्ति न भूतं न भविष्यति ।

यो वै वेदेषु सर्वेषु परमात्मेति गीयते ।
इतिहास पुराणेषु अन्तरात्मेति गीयते।

बाह्यात्मेति सुषुप्मास्थः स्वप्नस्थो जाग्रतः स्थितः।

सूर्य देवता सर्व ब्रह्माण्डाचे नेत्र आहे. प्रकाशाची

उत्पत्ती हीच देवता करते. ही नित्य वर्तमानकालीन देवता आहे. ही शाश्वत स्वरूपाची देवता आहे. या देवतेने सारी सृष्टी निर्माण केली आहे. आणि प्रलयकाली याच्या ठियातच ती विलयाला जाईल. या ब्रह्माण्डात जितके म्हणून ग्रह, नक्षत्र, तारे, योग, राशी, करण, वसु, वायू, आदित्य, अग्नी, नर, नाग पशु, पक्षी, नदी, समुद्र, पर्वत, तसेच वन, मरूस्थळ आदि भौतिक गोष्टी दृष्टी गोचर होतात, या साऱ्यांची उत्पत्ती पालन व विलयन याचे प्रमुख कारण सूर्यदेवता आहे. सूर्य उदयाने सर्वांना चैतन्य प्राप्त होते व त्याच्या अस्तसमयी सारे काही शांत होत जाते. सूर्याहून अधिक शक्तिशाली, प्रगतिशील देवता नाही. अन्तरात्मा या नात्याने ही देवता प्रत्येक प्राण्याच्या अंतर्बाह्य असते. तसेच स्वप्न जागर सुषुप्ति या तीनही अवस्थेत ही देवता स्थित असते. हेच वेद व पुराणांतून परमात्मा व अंतरात्मा या नावाने स्तविले जाते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सूर्य देव अनादी व अनंत आहे सृष्टीचा तो निर्माता आहे. सृष्टीच्या अंतापर्यंत त्याचे अस्तित्व अबाधित आहे. तोच निर्माता व पोषिता आहे. ब्रह्माण्डात जी काही शक्ती वा चैतन्य आहे ती सारी सूर्य देवतेत केन्द्रित झालेली आहे. अशा स्थितीत त्याला शाश्वत, अविनाशी, नित्य मानणेच योग्य ठरेल. विराट् पुरुष अथवा काल पुरुषाच्या स्वरूपात तो अजन्मा, अजेय, अज्ञेय, असीम व अपरंपार आहे. परंतु पुराणातून त्याच्या संबंधि अनेक जन्मकथा आढळतात. त्या कथांतून काही वेळा विपर्यस्त गोष्टी व मतमतांतरे पाहावयास मिळतात. असे असूनही सूर्यदेवतेची महिमा, तेजस्विता, अलौकिक शक्तिमत्व इत्यादीवर प्रतिकूल प्रभाव पडत नाही. प्रत्येक कथेने त्याच्या अलौकिकतेलाच पुष्टी मिळते. व्यक्ति मात्रागणिक कथेत भेद संभवतात. त्या कथांच्या संदर्भावरून कोणत्या प्रसंगाने त्यांतून भिन्न वर्णने आढळतात हे पाहिल्यास त्यांच्या संबंधी श्रद्धा दुणावते.

## सूर्य जन्म कथा -

अनेक कथा आढळतात. काही कथा मिळत्या-जुळत्या आहेत. काहींत बराच वेगळेपणा आढळतो. प्रभू रामचंद्र अनादी अनंत, सर्व लोकेश्वर तरी राम हा दशरथाचा पुत्र म्हणून कौसल्येच्या उदरी जन्मला. त्याचप्रमाणे सूर्य देवता महर्षि कश्यप पुत्र म्हणून अदिती मातेच्या उदरी जन्माला आला. अदितीच्या उदरी जन्मल्यामुळे त्याचे नाव आदित्य असे पडले. वडिलांच्या नावे त्याला काश्यप असे म्हणतात. (कश्यपस्य पुत्रः काश्यपः।)

आता या वरील घटनासंबंधी कथा अशी सांगितली जाते, देव व दैत्य यांचे युद्ध झाले. त्या युद्धात दैत्य व दानव यांनी आपली शक्ती एकवटून देवाचा पराभव केला. देवगण भीतीने इतस्ततः जाऊन दडून बसले. देवगण मनाने खिन्न झाले. परंतु दैत्य व दानव यांच्या शक्तीपुढे त्यांचे काही चालेना. ही दैन्यावस्था पाहून माता अदितीने असा विचार केला. महान कालपुरुष, अजेय, विराट रूप असलेला शक्तिपुंज सूर्यदेव कृपाळू होऊन प्रसन्न झाल्यास त्याच्या तेजांशाने मी एक अजेय पुत्र निर्माण करीन. आणि त्या पराक्रमी अजेय पुत्राच्या द्वारे आज होत असलेली देवगणांची पराभूत अवस्था नष्ट करता येईल. असा विचार करून देवी अदितीने आपले पती कश्यप यांच्याशी बोलणे केले. महर्षीनी या गोष्टीला मान्यता दिली. अदितीने सूर्याची उपासना सुरू केली. तिला यश लाभल्याने ती सूर्याची माता बनली. एक तेजस्वी बालक जन्माला आले.

या सूर्य जन्माच्या कथा मार्कंडेय पुराण, ब्रह्म पुराण, श्रीमत् भागवत, विष्णु पुराण, अग्नि पुराण, मत्स्य पुराण, भविष्य पुराण आदी पुराण ग्रंथांतून आढळतात. बहुतेक पुराणांतील कथा थोड्या फार फरकाने सारख्या आहेत. सारांश रूपाने कथा अशी तयार होईल. महाप्रलयानंतर समस्त ब्रह्मांड शून्यवत् होते. पृथ्वी जलमग्न होती. कोणत्याही प्रकारे कसलेच चिन्ह नव्हते. अशा अथांग

जलसागरात पहुडलेल्या भगवान विष्णुच्या नाभिकमला पासून एक कमळदण्ड उगवले. त्या दण्डावर मिटलेले एक मोठे पुष्प होते. ते हळूहळू उमलले व त्यातून चतुर्मुख ब्रह्म प्रकटला. तो सृष्टीकर्ता होता. त्याने उच्चारण केलेला प्रथम ध्वनी ॐ होता. हा ध्वनी सर्व ब्रह्मांड व्यापून राहिला त्यातून ओज व प्रभाव सर्वत्र पसरला.

## एकोऽहं बहुस्याम्

कमळ पुष्पात एकाकी राहिल्याने हा एकाकीपणा नष्ट करण्याची ब्रह्माला इच्छा झाली. आपण सृष्टीची रचना करावी, असे त्याला वाटले. त्यासाठी त्यांनी अनेक तप केले. आपल्यातील दिव्य शक्ती प्रकट केली. योगबल व अलौकिक तेज प्रभावाच्या द्वारे त्यांनी नर नारींना उत्पन्न केले. त्यांना सक्रिय व जिवंत केले. याप्रकारे ब्रह्मपुत्र जन्माला आले. जग विस्तारासाठी नर-नारींची आवश्यकता आहे. ब्रह्माने त्या सर्वांना आज्ञा केली. तुम्ही पृथ्वीवर प्रजा सृष्टी निर्माण करा. दक्ष, मनु, मरीचि आदी विख्यात पुरुष ब्रह्मदेवापासून उत्पन्न झाले होते. त्यांनी विविध गणांची निर्मिती केली.

ब्रह्माने मरीचीला अदिती नावाच्या स्त्रीशी संग करण्यास सांगितले. मरीचीच कालान्तराने कश्यप म्हणून प्रसिद्धीला आले. या उभयताचे जीवन सात्विक, साधे, लोकोपकारी आणि तापसमय होते. ती उभयता वानप्रस्थ स्वीकारून निरंतर तपाचरण करीत असत. आदितीच्या संतानाला देवगण ही संज्ञा प्राप्त झाली. ब्रह्माची दुसरी मुलगी दिती हिच्या संतानाला दैत्य अशी संज्ञा पडली. ब्रह्मपुत्र मनु याने मानव वंशाचा विस्तार केला व दनूचे वंशज दानव झाले. कालांतराने या गणांत सत्तेसाठी वितुष्ट निर्माण झाले. ते आपआपसात लढू लागले. दैत्य व दानव संघटितरित्या देवगणावर प्रचंड आक्रमण करू लागले. देवगणांचे अस्तित्वच धोक्यात आले. त्यांच्यातील भांडण चालूच राहिले. असे वाटे या युद्धामुळे विश्व संहार होऊन सर्वनाश होईल. या देवगणांच्या संकटकाळी कश्यप अदिती यांनी सूर्याची उपासना केली. त्यांच्या आराधनेने सूर्य प्रसन्न झाला व त्यांना वर देता झाला. अदितीने प्रार्थना केली की माझ्या संतानांचे रक्षण कर.

सूर्य देवांनी अदितीला आश्वस्त केले. मी सहस्त्र किरणांनी युक्त आहे. माझे तेज विश्वव्यापी आहे. माझा किरणांश तुझ्या गर्भात स्थापित करीन व देवरूपात जन्माला येईन. दैत्य दानवांचा पराजय करीन आणि तुझ्या संतानावरील संकट दूर करीन. या वचनाने अदिती सुखावली. तिच्या भोवतालचे तेजोवलय पुनः विश्वाशी एकरूप झाले.

कालान्तराने अदिती गर्भवती झाली. तो गर्भ असामान्य होता. सूर्यशक्तीने युक्त तो गर्भ होता. यामुळे मंगल भावनेने अदिती अनेक प्रकारचे व्रत करू लागली. तिचे शरीर दिवसें दिवस कृश होऊ लागले. हे पाहून कश्यप तिला म्हणाले, "तू स्वतः तहान भूक याची पर्वा न करता उग्र व्रताचे आचरण करतेस. अशाने गर्भ मारून टाकशील. काही विवेक कर. तुझ्या अशा व्रत उपवासाने गर्भाला इजा पोचणार तर नाही?" आपल्या पतीला पुत्रप्रेमाची भावना निर्माण झाली आहे हे तिने ओळखले. ती म्हणाली - हा साधा गर्भ नाही. साक्षात् सूर्य देवाचा कृपाप्रसाद म्हणून मी गर्भवती झाले आहे. आपण अजिबात चिंता करू नये, हा माझा पुत्र सर्व दैत्यांचा संहार करील. आपण धीर धरा व वाट पहा.

कश्यपांना इतके बोलून देखील तिला पतीचे बोलणे जिव्हारी लागले व अपमानित झाल्या सारखे वाटले. तिने अपान वायूने त्या गर्भस्थ अण्डाला शरीराबाहेर टाकले. अण्ड रूपाने बाहेर पडलेला तो गर्भ आपल्या प्रकाशाने सर्व दिशा उष्ण करता झाला. थोड्याच अवधित या गर्भाने प्रकाश आणि उष्णता याद्वारे विस्तारित रूप धारण केले. हे पाहून कश्यपमुनी गडबडले आपण अदितीला उगाच

बोललो. व असा उत्पात घडला म्हणून त्यांनी सूर्याचे स्तवन केले व त्याजकडे क्षमायाचना केली. त्यावेळी आकाशस्थित सूर्याने अशी घोषणा केली, 'हे कश्यप तू रागाच्या भरात आपल्या पत्नीला भ्रूण हत्या करीत आहेस असे म्हटलेस. हा गर्भपिंड गर्भातच मरतो असे म्हटलेस व आता मजकडे क्षमा याचना करतोस? ठीक आहे. जा तुला क्षमा केली आहे. मात्र बाहेर पडलेल्या गर्भाण्डाची उपेक्षा करू नकोस. हे गर्भाण्ड सहस्त्र किरणांनी व सहस्त्र नावांनी प्रसिद्धीला येईल याचे नाव मारिताण्ड अथवा मार्तांड असे पडेल.

या देव वाणीवर उभयतांची अतूट श्रद्धा निर्माण झाली. सर्व क्रोध अहंकार याचा त्याग करून सात्विक भावनेने त्या अण्डाला साक्षात् सूर्यशक्तीचा पिण्ड मानून वेद मंत्राने त्याची स्तुती केली. वेदमंत्रामुळे काही काळातच गर्भाण्ड उत्तेजित झाले. आणि ते अण्ड फुटले. त्यातून एक तेजस्वी बालक प्रकट झाले. त्याच्या पासून तेजोराशी प्रमाणे किरणे निघत होती. त्या किरणांनी खूप मोठा अवकाश व्यापला हेच बालक सूर्यदेवता या नावाने विख्यात झाले. कालान्तराने आपल्या प्रभावाने आणि गुणाने त्या बालकाला अनेक नावे प्राप्त झाली.

सूर्यासारखा तेजस्वी नायक मिळाल्याने देवगणांची ताकद सहस्त्रपटीने वाढली. त्यांनी दैत्यांना युद्धासाठी पाचारण केले. घनघोर युद्ध झाले. सूर्याचे तेज असह्य झाल्याने दैत्य व दानव सैरावैरा पळाले. देवगणाचा विजय झाला. सूर्यदेव सर्वात तेजस्वी, अजेय, पराक्रमी, विद्वान, दयाळू, दीन रक्षक, दुष्ट संहारक या नावाने ओळखला जाऊ लागला. आणि तो विश्व नियंता व रक्षक प्रशासक ठरला. तो ग्रहराज म्हणून स्वीकारला गेला. आज सूर्य मंडळात राहून तोच अखिल विश्व नियंत्रित करीत आहे.

**<u>सूर्य परिवार व वंशवृद्धी</u>**

दैत्य दानवांचा पराभव झाला. देवगण राज्य करू लागले. देवांची दुरवस्था दूर झाली. देवगणांचा परिवार वृद्धिंगत होऊ लागला. प्रजापती विश्वकर्मा याने आपली मुलगी संज्ञा हिच्याशी सूर्याचा विवाह केला. सूर्याचा ग्रहस्थाश्रम सुरू झाला. त्याला संज्ञेपासून एकूण तीन मुले झाली. दोन मुलगे - मनु व यमआणि एक मुलगी यमुना (यमुना नदी) सूर्याचे तेज संज्ञेला असह्य होऊ लागले. म्हणून तिने आपल्या योगबळाने आपल्यासारखी प्रतिकृती छायेच्या रूपात निर्माण केली. ती संज्ञेसारखीच होती. तिच्यात काही बदल नव्हता. तोच स्वभाव, तसेच रूप जणू सर्व काही संज्ञाच. तिला सूर्यदेवाकडे ठेवून संज्ञा 'उत्तरकुश' इथे न कळता निघून गेली. सूर्याला काही पत्ताच लागला नाही. त्याचे दांपत्य जीवन पुढेही सुरळीत चालले. छायेपासून सूर्याला तीन अपत्ये झाली. एक संवीर्ण, दुसरा शनी व तिसरी मुलगी तपति ( तापी नदीत रूपांतर). तपति ही संवारण नांवाच्या राजाची पत्नी झाली. हळूहळू छायेचे मन कलुषित होऊ लागले. संज्ञेच्या मुलांना ती व्यवस्थित वागवेना. मनु हा मृदू स्वाभावाचा असल्याने तो शांत राहिला. दुसरा यम, तिच्या विरुद्ध वागू लागला. तिने त्याला शाप दिला. हे पुत्र तू मरणाऱ्यांचा अधिपती हो. सूर्याला छाये संबंधी हकीकत कळली. त्याने आपल्या पुत्राला उःशाप दिला. हे पुत्र आजपासून तू धर्मराज म्हणून ओळखला जाशील. समस्त प्राणिमात्रांचे जीवन, त्यांची कर्मफळे यावर तुझे नियंत्रण राहील. त्याप्रमाणे तू त्यांना वागवशील. याप्रमाणे सूर्यदेवाने संज्ञेच्या मुलाला उःशाप दिला. परंतु त्याचे समाधान होईना. म्हणून त्याने छायेच्या मुलाला शनीला शाप दिला. हे पुत्र, तुझी माता क्रोधी व क्रूर आहे म्हणून तुझी दृष्टीही तिच्या सारखीच क्रूर व क्रोधी होईल. तेव्हापासून शनी हा कुदृष्टी व क्रूर म्हणून विख्यात आहे. यानंतर सूर्यदेव उत्तरकुशात गेले. तिथे संज्ञा त्यावेळी घोडीच्या रूपात होती. सूर्यदेव अश्व झाले व घोडीशी संग केला. यावेळी तिला जुळे झाले. त्यांना अश्विनीकुमार म्हणतात. त्यांचे शिर घोड्याचे व शरीर मानवाचे होते.

विश्वकर्म्याने सूर्याचे तेज कमी केले. मग संज्ञा, त्याच्या जवळ नांदू लागली. त्या उभयतांचे दांपत्य जीवन पुनरपि सुरु झाले.

आजही यमराज धर्मराज या नावाने ओळखला जातो. प्राणिमात्रांच्या कर्माप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे न्याय देत आहे. संज्ञाखेरीज सूर्याला आणखी बायका होत्या. रात्री व प्रभा. रात्री म्हणजे रात्र, व प्रभा म्हणजे प्रभात. रात्री कडून वंश वाढला. तिच्या मुलाचे नाव रैवत. प्रभा हिला प्रभात नावाचा पुत्र झाला. तो शांत सुखद सौंदर्ययुक्त होता. याप्रमाणे सूर्याचा वंश वाढला.

<u>वंशाचा विस्तार</u>

सूर्य देवाला एकूण दहा मुलगे व तीन मुली झाल्या. कालांतराने मुलापासून वंश विस्तार झाला. संज्ञेपासून झालेल्या वैवस्वत मनूला दहा मुलगे झाले. त्यांची नावे अशी होती. इस्वाकु, नाभाग, धृष्ट, शर्याति, वरिष्यन्त, प्रांशु, नृग, दिष्ट, कण्व व पुरु तु, शिवाय एक मुलगी पण झाली. तिचे नाव इला. तिचा विवाह बुधाशी झाला. तिला पुरुवा नावाचा मुलगा झाला. या पुत्रानंतर इला हिने योगिक क्रियेने स्वतःला पुरुषात रूपांतरित केले. या पुरूषाचे नाव सुद्युम्न. याने एका राजकुमारीशी लग्न केले. त्याला तीन मुले झाली. उत्कल, जय व विनिताश्व अशी तियांची नावे होती.

सूर्याच्या दहा पुत्रापैकी फक्त इक्ष्वाकूच्याच वंशाचा विस्तार झाला. इतर पुत्रांचे वंश दोन तीन पिढ्यात नष्ट झाले त्यापैकी एक अंबरीष राजा प्रसिद्ध झाला. हा सूर्यपुत्र नाभाग या दुसऱ्या मुलाचा मुलगा. धर्माचरण व वैष्णवी भक्तीमुळे त्याचे नाव प्रसिद्ध झाले. धृष्टपासून धार्ष्टिक झाला. शर्यातीला दोन मुले झाली. सुकन्या व आनर्त. इतरांचे वंश न वाढल्याने ती प्रसिद्ध नाहीत. साऱ्या राजे लोकात इक्ष्वाकु याचे नाव प्रथम घेतले जाते. हा पहिला सूर्य वंशीय नरेश. याच्या मुलाचे नाव विकुक्षी, त्याचा मुलगा काकुत्स्थ, याच्यानंतर मोठा वंश विस्तार झाला. त्यांची नावे अशी आहेत - काकुत्स्थ-पृथु-युवनाश्व-श्रावन्तक-वृहदश्व-कुवलाश्व- (हाच धुंधुमार) दृढाश्व (दृढाश्व याला हर्यश्व, प्रमोदक) हर्यश्व-निकुम्भ, रोहताश्व-अकृशाश्व, रणाश्व-युवनाश्व-मान्धाता -पुरुकुत्स मुचुकुन्द पुरुकुत्स-त्रसदस्यु-सुधन्वा - त्रिधन्वा - तरूण- सत्यव्रत - हरिश्चंद्र - रोहिताश्व - वृकबाहु - सगर (६० हजारपुत्र) असमंजस अंशुमान दिलीप भगीरथ - नाभाग - अंबरीष - सिन्धुद्वीप श्रतायु, ऋतुपर्ण - कलमाषपाद - शर्वकर्मा - अनरण्य - निघ्न - दिलीप - रघु-अज-दशरथ, रामचंद्र, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न (एकूण चारमुले) रामचंद्र - लव , कुश, भरत - लक्ष, पुष्कळ, लक्ष्मण - अंगद, चित्रकेतु, शत्रुघ्न - सुबाहु शत्रुघाती- यानंतर सूर्य वंशाच्या अनेक शाखा विस्तारित झाल्या. त्यापैकी कित्येक शाखा आजही सूर्यवंशी क्षत्रिय म्हणून विद्यमान आहेत.

(क्रमशः)

शं. बा. मठ
६, कुमार आशिष
राम मारुती रोड, ठाणे
४०० ६०२.

•••

<u>दिशा</u>
वर्गणीसाठी संपर्कः
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी २५४२६२७०

# नामस्मरण - नाम श्रेष्ठ ! की स्मरण !

*नामस्मरणाचे महत्त्व स्वयंसिद्ध आहे. श्रीमती आशाताई भिडे नामस्मरणाबाबत आपले विचार मांडत आहे.*

- संपादक

अन्तकाळे च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।

य: प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशय:॥८.५

आणि जो पुरुष मरणसमयी माझेच स्मरण करीत हा देह सोडतो, तो माझ्या स्वरुपास प्राप्त होतो, यात संशय नाही.

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।

मर्य्यर्पितमनोबुद्धि ममिवैष्यस्यसंशय:॥८.७

म्हणून तू सर्वकाळी माझे स्मरण कर आणि युद्ध कर. मन व बुद्धी माझ्याच ठायी अर्पण केलीस म्हणजे लढाई करुनही तूं नि:संशय मलाच येऊन मिळशील.

पुढे अध्यायातल्या ८ व्या श्लोकात भगवंत स्वत:च सांगतात हे पार्था, चित्त दुसरीकडे जाऊ न देता ते अभ्यासाच्या साहाय्याने स्थिर करुन दिव्य पुरुषांचे निरंतर चिंतन करीत राहिले, म्हणजे तो त्यालाच जाऊन मिळतो. म्हणून अध्याय आठवा मला आठवा. आठव्यात तर भगवंत, माझे स्मरण मृत्युसमयी जो करेल तो मला येऊन मिळेल असे म्हणतात. पण फक्त मृत्युसमयी देवाचे नाव आठवेल का हो? आयुष्यभर देवाचे स्मरण केले नसेल तर ! कारण ज्या गोष्टींचा विचार उच्चार सतत असतो तीच माणसाला मृत्युसमयी आठवणार. मग हे जर माहीत आहे तर भगवंताला नेहमीच, नित्य का स्मरू नये? कारण मृत्युच्या क्षणावर (शेपटावर) पाय ठेऊनच आपण पुढील जन्मात जात असतो. परंतु अशा अंतिम क्षण साधण्याच्या खटपटीपेक्षा संपूर्ण जीवन हीच साधना बनवणे जास्त सोपे व योग्यही आहे. म्हणजे तो क्षण मुद्दाम साधावा लागणार नाही. (समजा नाही साधला, निसटला तर!) साधनेच्या ओघात तो क्षणही गाठला जाऊ शकेल! हरिनाम फक्त थोडावेळ, त्या क्षणापुरतेच कशाला घ्यायचे? गीता सांगते, संपूर्ण जीवनच हरिमय होऊ दे.

न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावक:।

यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ १५.६

सूर्य त्या ब्रह्मपदाला प्रकाशित करु शकत नाही. चंद्र किंवा अग्निही प्रकाशित करीत नाहीत. योगी ज्या पदाला गेले असता परतून येत नाहीत, तेच माझे परमधाम होय.

भगवंताचा पत्ता १५व्या अध्यायातील सहाव्या श्लोकात मिळालाय. त्या परम्धामात प्रत्येक जीवाला जाण्याची इच्छा आहे. जिथून आलो तिथेच परत जायचेय. पण जायचे कसे? पोचायचे कसे तिथे? कारण - सजन रे झूठ मत बोलो, खुदा के पास जाना है। ना हाथी है ना घोडा है वहाँ पैदलही जाना है॥

नाम हे परमात्मा प्राप्तीकडे मुक्तीकडे नेणारे साधन आहे. त्या नामामधेच स्मरण ठासून भरलेले आहे. त्यामुळे नाम श्रेष्ठ की स्मरण हा प्रश्नच नाही. नाम काय, स्मरण काय एकच. भगवंताच्या नामामधेच भगवंताचे स्मरण साठवलेले आहे.

खरं पाहिलं तर भगवंत कुठे लांब नाही. तो कुठून

बाहेरुन यायचा नाही, की आकाशातून पडायचा नाही, की खणून काढायचा नाही. 'कुठे शोधीशी रामेश्वर अन् कुठे शोधीशी काशी। हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी॥ आपल्या खऱ्या प्रेमाला नि:स्वार्थी प्रेमाची साद देणारा सद्गुरु अथवा भगवंत आपल्या हृदयातच विद्यमान आहे. त्याच्या सत्तेने आणि त्याच्या प्रेरणेनुसार आपण जीवनात आपली कर्मे करतो. आपल्याला जिवंत ठेऊन नाचविणाऱ्या त्या सूत्रधाराचा आपल्याला सहज विसर पडतो. तो न पडावा यासाठी भगवंताचे अखंड नाम घ्यावे. असे श्री ब्रह्मचैतन्य गोंदोळेकर महाराजांचे नित्य सांगणे आहे. त्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य खर्ची घातले. प्रापंचिक लोभ, मोह यामुळे आपल्याला भगवंताचा व त्याच्या नामाचा विसर पडतो. विसर पडला की जीव भगवंताला विन्मुक्ष होऊन प्रपंचाला सन्मुख होतो. ''मुखी रामाचे नाम। बाह्य प्रपंचाचे काम । ऐसा राम जोडा मनी। न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण॥'' हा रोकडा अनुभव नामस्मरणाचा मार्ग अनुसरणाऱ्याला येईल, असे श्री गोंदोळेकर महाराज त्यांच्या प्रवचनांत म्हणतात, ज्ञानेश्वर महाराजही हेच सांगतात. आणि

गृहादिक आघवे । काहीच न लगे त्यजावे।

जे घेते झाले स्वभावे । नि:संग म्हणवुनी॥

मी आणि माझे ऐसी आठवण।

विसरले जयाचे अंत:करण । पार्था तोचि संन्यासी जाण । निरंतर ॥

देव व नाम भिन्न नाहीत. वेदाप्रमाणे नामही अनादी अनंत अपौरुषेय आहे. नामाशिवाय कशानेही समाधान नाही. नाम बेंबीच्या देठापासून घ्यावे कारण वासनांचा उगम तिथेच आहे. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण. बद्ध-मुमुक्षू-साधक-सिद्ध या मोक्षमार्गाच्या पायऱ्या आहेत. भगवंताकडे लक्ष लागले की आत्मज्ञान आपोआप होईल. त्यासाठी जिभेला नामाचा चाळाच लावून द्या. देहावर प्रेम करता तसे नामावर करा. भगवंताचे नाम स्वयंभू आहे स्वाभाविक आहे. भगवंताच्या अनुसंधानात राहण्याचा उपाय म्हणजे अखंड नामस्मरण. नाम अभिमान, अहंकाराचा नाश करते. नामात राहणे म्हणजे मरणातीत होणे, नाम सहजपणे येणे याचे नाव अजपाजप. योगाने जे साधते तेच नामाने साधते. नाम परमात्म्याची भेट करुन देईल, एक न एक दिवशी.

नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे, नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबरच ते बाहेर पडावे, असे नाम जो घेतो त्याला सुखदु:खाची जाणीवच राहणार नाही. नाम चिरंतन आहे; त्याला अंत नाही. नामात आनंदाशिवाय दुसरे काहीच नाही. असे श्री. गोंदोळेकर महाराजांचे म्हणणे आहे.

नामात रंगुनिया, व्यवहारी सर्व भोग भोगावे ।

हाचि सुबोध गुरुचा, भोगासंगे कुठे न गुंतावे॥

गीतेचाही हाच संदेश आहे. कर्म कर पण फलात गुंतू नको.

नाम जीव व शिवातला दुवा, आपली वृत्ती व भगवंत यांना जोडणारी साखळी आहे. वास्तविक नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. नाम हे रूपाच्या आधीही असते व नंतरही उरते. नाम, रूपाला व्यापून राहते. 'रामायण आधी मग झाला राम जानकी वर' राम जन्मायच्या आधीच वाल्मिकींनी 'रामायण' लिहिले व रामाने नंतर ते नाटकाप्रमाणे केले. रामरूप नाहिसे झाले तरी नाम शिल्लक आहे. भगवंत स्वत: अरूप आहे. आपण तरी भगवंताला कुठे हो पाहिले? त्यामुळे कोणी 'श्रीराम जयराम जयजय राम 'तर कोणी 'हरे राम हरे राम रामराम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे' हे, तर कोणी 'ॐ नम:शिवाय' असे नामस्मरण करतात. ज्याचा

जो देव त्याप्रमाणे लोक नामस्मरण करतात. जरी 'सर्व देवों नमस्कार: केशवं प्रतिगच्छति।' हे माहीत असले तरी यासाठी कोणत्याही रूपात ध्यान (स्मरण) केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात व अखेर त्यातच लीन होतात, म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ. तुम्ही त्याचे नाम घ्या आनंदात रहा. नामाबरोबरच प्रेम येते तो त्याचा धर्मच आहे. नामात माझे कल्याण आहे या भावनेने नाम घ्या.

येतु सर्वाणी कर्माणि मयी संन्यस्त मत्परा:।

अनन्ये नैव योगेन मां ध्यावन्त उपासते ॥१२.६

हा दुस्तर भवसागर तरायला जीवाला अतिशय कठीण आहे. सर्व कर्मे भगवंताला अर्पण केली, भगवंताचे नित्य स्मरण व भजन केले तर अनन्य भक्ताला भगवंत भवसागर तरायला हात देतो त्याचा उद्धार करतो. तेषामहं समुद्धर्ता मृत्यूसंसारसागरात । भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचे तस्ताम गीता ॥१२.७

'ही राम नाम नौका भवसागरी तराया' नाम हे मुक्तीकडे नेणारे साधन आहे.

नुसते ध्यान लागत नाही त्यामुळे नुसते स्मरण करताना मन स्थिर एका जागी रहात नाही. गीतेत सहाव्या अध्यायातील चौतिसाव्या श्लोकात अर्जुनाने म्हटले आहे-

चंचलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद दृढम् ।

तस्याहं निग्रहं मन्ये वायेखि सदुष्करमे ॥ ६.३४

हे कृष्णा, मन हे चंचल दांडगे, बलिष्ठ व दृढ म्हणजे वळविण्यास कठीण आहे. त्याला आवरणे हे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे कठीण वाटते. त्यावर पुढच्याच श्लोकात भगवंताने उत्तर दिले, की हे मन चंचल व आवरण्यास कठीण आहे यात शंका नाही पण हे कौंतेया ! अभ्यासाने व वैराग्याने ते स्वाधीन ठेवता येते.

त्या मनाला आवरण्यासाठी, स्थिर एका जागी बसवण्यासाठी नामरूप साखळीने त्याला बांधून टाकणे हे आपल्याला करता येण्यासारखे आहे. म्हणून नाम सतत मुखाने घ्यायचे तेही मोठ्याने हाक मारल्यासारखे घ्यायचे. (आपण प्रेमाने साद घातली तर तो 'ओ' देईल) म्हणजे ते मुखाने घ्यायचे, कानांनी ऐकायचे, मनाने त्याचे रुप आठवायचे, हृदयात साठवायचे.

घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे ॥

तुम्ही आईका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥

डोळे तुम्ही घ्यारे सुख । पाही विठोबाचे मुख ॥

मना तेथे धाव घेई । राही विठोबाचे पायी ॥

नामाचा मार्ग अंतर्मनात, आत उतरण्याचा आहे बाहेर पडण्याचा नाही. प्रेमाने आवडीने भगवंताचे नाम घेत असता, भगवंत माझ्यापाशी आहे असे वाटले तर तो तसा आहेच. पण तो नाही असे वाटले तर असून नसल्यासारखे होते म्हणून नाम घेत त्याच्या नावाने ओरडावे तरी किंवा नामाचा हात धरून मौनातच रहावे.

जसे शिवशक्ती एकरुप आहेत. तसेच भगवंताच्या नामामध्ये भगवंताचे स्मरण साठवलेले आहे. भगवंताचे नाम व भगवंतावरील श्रद्धा यातून भगवत भक्ती निर्माण होते. भक्ती म्हणजे भगवंतावरील उत्कट प्रेम. उत्कट प्रेम हे रसायन आहे त्यामध्ये मोठी शक्ती साठवलेली असते. ते प्रेम नामस्मरणाने मनाच्या तळाशी जाऊन तेथे असलेला अविद्येचा पडदा फाडून स्वरुपाशी भिडते. ते प्रेम कसे संपादन करावे याबद्दल मार्गदर्शन श्री. गोंदोळेकर महाराजांच्या प्रवचनांमधे आहे. ते म्हणतात प्रत्येकाच्या अंतर्यामी एक गूढ सौंदर्य आहे ( अलौकिक असे आत्मतेज) भगवंताच्या नामाने माणूस त्या सौंदर्यापर्यंत पोचू शकतो. (योग जे कार्य करते तेच नाम करते) त्याच्या

दर्शनाने होणाऱ्या आनंदातून दिव्य प्रकाश लाभतो मग माणसाला काळ, मृत्यू, अज्ञान, दुःख यांना त्याच्या जीवनात स्थान उरत नाही. त्याला कसलेही बंधन व पराधीनता उरत नाही. हा अखंड आनंद हेच आपले खरे स्वरूप. त्यासाठी प्रवचनांद्वारे अखंड रामनाम घेण्याचा आग्रह श्री. गोंदोळेकर महाराजांनी केला आहे. 'एक जरी व्यक्ती माझ्या प्रवचनांद्वारा अखंड नामजपाला लागली तरी माझ्या जन्माचं सार्थक झाल्यासारखं वाटेल, असं ते म्हणत.

दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, साधनात साधन नामस्मरण. भगवंत मुळात निर्गुण निराकार, तो सगुणात आला तेव्हाच त्याला नावरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले. म्हणून नाम निर्गुणही आहे.

स्त्री जशी पतीशी एकरूप होते तशी वृत्ती नामरूप बनली पाहिजे. नाम सूक्ष्म. वृत्तीही सूक्ष्म. नाम घेण्याने वृत्ती सुधारली की मन शांत होईल. त्यामुळे निष्ठा उत्पन्न होईल. देहबुध्दी कमी होईल. शेवटी नाम हे परमात्म स्वरुप आहे असा अनुभव येईल. पाणी शरिराचे जीवन तसे नाम मनाचे जीवन. शरीराने तप व मनाने जप करावा.

भगवंताचे नाम हे औषध व भगवंताची प्राप्ती हे फळ. श्वास चालू आहे, स्मृती आहे तोवर नाम घ्यावे. अहंचा अन्त म्हणजे एकान्त. नाम एकान्तात घ्यावे. एकाचा अन्त म्हणजे एकान्त. द्वैत गेले की तेथे एकाग्रता आपोआप आलीच. एकाग्रता साधते तीच समाधी, तीच मोक्ष, तीच परमात्म प्राप्ती.

प्रपंचातून परमार्थाकडे जाण्याचा नाम हाच पूल. प्रपंचाच्या घडीला न विस्कटता बाह्यांगामधे बदल न करता त्याला स्वरूपाचा साक्षात्कार होतो. भगवंताच्या नामात ज्याचे अंतरंग रमू लागते. त्याचे अंतःकरण शुद्ध म्हणजे सूक्ष्म होत जाते. शुध्द अंतःकरण व्यापक बनते. व्यापकपणाने साध्य व साधन (भगवंत व त्याचे नाम) यातील अंतर कमी होत जाते. अखेर नामाला इतकी सूक्ष्मता येते की नाम व भगवंत यात फरक दाखवणे अशक्य होते. मग नाम घेणारा जो मी, तो एक नामरूप तरी होता नाहीतर भगवंत रुप होऊन सोऽहं म्हणू लागतो. पूर्णता पावलेल्या सिद्धाचीच ही अवस्था होय.

देतो तो देव. परमेश्वराकडून मानवाला किती तरी देणग्या प्राप्त झाल्या आहेत.

डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो कानी, पदी चालतो ।

जिव्हेने रस चाखितो, मधुरही वाचे आम्ही बोलतो ।

हातांनी बहुसाळ काम करतो, विश्रान्ती ही घ्यावया ।

घेतो झोप सुखे फिरुनी उठतो ही ईश्वराची दया॥

अशा परमेश्वराचे कृतज्ञतेने व प्रेमाने स्मरण करणे हे आपले आद्य कर्तव्यच आहे. तसे करण्यात परमेश्वराची भक्ती आहे. असा जीवन विद्येचा सिद्धान्त आहे असे सद्गुरु डॉ. वामनराव पै यांचे म्हणणे आहे.

नाम स्मरणात । अपार सामर्थ्य । ना कळोही अर्थ। त्याचा काही ॥ असे प्रा.उषा लिमये यांनी अभंगावळीत म्हटले आहे. मरा मरा असे उफराटे नाम घेऊन वाल्याचा वाल्मिकी झाला. शिवलीलामृतातील दुसऱ्या अध्यायात एका पारध्याच्या हातून नकळत बिल्व दलांचा अभिषेक खाली असलेल्या शिवलिंगावर होतो. खायला न मिळाल्याने उपवास घडतो व कंटाळून तो दिवसभर शिकार न मिळाल्याने शिव शिव म्हणतो आणि नकळत घडलेल्या का होईना पण या गोष्टींमुळे त्याला पुण्य लाभते.

मरा शब्द उलटा केला की राम होतो तसाच मना शब्द उलटा केला की नाम होतो. नामात मन उलटे केले

जाते मग साधनांची गाडी सुरू होते. ज्याप्रमाणे हवे शिवाय माणूस जगू शकत नाही. त्याप्रमाणे अहंकार नाशाशिवाय माणूस परमार्थी होऊ शकत नाही. अहंकाराची दुसरी बाजू परमात्मा आहे. त्या अहंकाराचा नाश करण्यासाठी नाम हा रामबाण उपाय आहे. भगवंताचे नाम । करते परमार्थाचे काम ॥ भगवंताचे स्मरण । म्हणजे अहंकाराचे मरण ॥ परमार्थाचे काम ॥ भगवंताचे स्मरण । म्हणजे अहंकाराचे मरण ॥ परमार्थांत एकान्ताची अत्यंत गरज असते. अहंकाराचा अंत म्हणजे एकान्त, अहंकाराचा नाश झाल्याशिवाय एकान्त साधणे, म्हणजे चित्रातले अन्न खाऊन पोट भरण्यासारखे आहे. नामात भगवंताचे प्रेम आहे. ताक घुसळल्यावर लोणी वर येते (अगोदर ते दिसत नाही) नाम घुसळले म्हणजे भगवंताच्या प्रेमाचे लोणी वर येते. इतर साधने आपल्याला लठ्ठ करतात, नाम घट्ट करते. गीतेच्या गाभाऱ्यात या आपल्या पुस्तकात न्या. राम केशव रानडे यांनी असे म्हटले आहे.

संकटकाळी, परीक्षेच्या वेळी, शुभकार्याच्या वेळी आपण भगवंताचे स्मरण करतो. पण ते तेवढ्यापुरतेच असते. नुसते स्मरण करणे (दीर्घ-काळ) म्हणजे ध्यान लावणे. हे ध्यान जास्त वेळ टिकत नाही कारण मन हे एका जागी स्थिर रहात नाही, ते भटकत राहते, आपण पोथी वाचत असतो त्यावेळी नजर शब्दांवरून फिरते, शब्द तोंडाने उच्चारले जातात पण मन मात्र दुसऱ्याच विचारात भरकटलेले असते. नाम मोठ्याने उच्चारले की मन जरी भरकटले तरी त्याला पुन्हा नामापाशी आपण पकडून आणू शकतो, अचपळ मन माझे नावरे आवरिता । तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ॥ रामदास स्वामींनीच करुणाष्टकात श्लोकात हे म्हटलेले आहे, नाम मोठ्याने घेतले तरी बरेचदा मन तिथे नसते. त्याला मनाला स्थिर करण्यासाठी ' केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा' किंवा 'नाम घेता तुझे गोविंद मना लागलिया छंद' असा गोडवा, असा छंद मनाला वाटला पाहिजे, लागला पाहिजे.

स्मरणात नाम आहे नि नामात स्मरण आहे. शिवापासून शक्ती वेगळी नाही. सूर्य व त्याची प्रभा, मोती व त्याचे पाणी, साखर व तिची गोडी जशी एकरूपच आहेत, अलग नाहीत.

चंद्र तेथे चंद्रिका । शिव तेथे अंबिका

संत तेथे विवेका । असणेच की ॥

असे ज्ञानेश्वरांनी म्हणून ठेवलेले आहे. तसेच

नाम तेथे स्मरण । स्मरण तेथे नाम। असणेच की ॥

**आशा भिडे**

बी/१, विजय अपार्टमेंटस्

आराधना टॉकीजवळ,

ठाणे (प) ४०० ६०२.

दूरध्वनी - २५४१०१४०

•••

दिशा

नियमित वाचा

# 'कागद विरहित ग्रंथालये'

*कागदविरहित ग्रंथालयात अनेक तंत्रज्ञानाचा विचार असतो, यातील काही बाबी स्पष्ट करणारा हा विशेष लेख - संपादक*

आजपर्यंत सर्व स्तरांवर झालेल्या विकासामुळे मनुष्याच्या कार्यांचा व्याप वाढला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि साधने यांचा वापर करुन कार्यशैलीचा विकास करण्याकडे मनुष्याचा कल राहिला आहे. व्यापार, उद्योग, शिक्षण, ग्रंथालय या क्षेत्रांमध्ये संगणकाचा वापर सुरू झाला आहे संगणकाचा वापर करण्याची इच्छा, उत्सुकता आणि जागरुकता यामुळे सर्व क्षेत्रांमध्ये अधिकाधिक संगणकीकरण होणार आहे. संशोधन व शैक्षणिक ग्रंथालयांप्रमाणेच सार्वजनिक ग्रंथालयांनीही संगणक वापरण्यास सुरुवात केली आहे.

ग्रंथालयातील वेगवेगळ्या कार्यांचे मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण करणे म्हणजे त्या ग्रंथालयाचे स्वयंचलित व्यवस्थापन(Library Automation) करणे होय. दूरध्वनी, दूरसंचार आणि दृक श्राव्य तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या साधनाचा ग्रंथालय सेवेच्या विकासासाठी वापर करणे अपरिहार्य झाले आहे. स्वयंचलित ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये संगणक व त्याची पूरक साधने, दूरध्वनी व दूरसंचार साधने यांचा दैनंदिन ग्रंथालय कार्यासाठी वापर करणे अभिप्रेत आहे. पंचकार्डापासून मुद्रणयंत्रापर्यंतची अर्ध स्वयंचलित व पूर्ण स्वयंचलित साधने यामध्ये समाविष्ट होतात. वाढत्या माहितीस्त्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी मनुष्यबळाला संगणक संग्रहण साधनांची जोड देऊन ग्रंथालय सेवांचा विस्तार करणे आवश्यक झाले आहे. मनुष्यबळाच्या स्मृतीवरील ताण कमी करुन संगणकाच्या स्मृतीवर हस्तांतरित केल्यामुळे माहिती विस्फोटाचे नियंत्रण करणे सोपे जाणार आहे. संगणक हा मनुष्याच्या मेंदूचा पर्याय नसल्यामुळे, ग्रंथालयातील संगणक वापरामुळे मनुष्यबळाची आवश्यकता नष्ट होईल अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

खूपशी माहिती लहानशा जागेत सामावून ठेवण्यासाठी सूक्ष्मपटांचा उपयोग केला जातो. इलेक्ट्रॉनिक माध्यमातही प्रचंड माहिती अगदी थोडक्या जागेत सामावून ठेवता येते आणि तितक्याच कमीत कमी वेळात, हवी तेव्हा परत प्राप्त करता येते. अनेक प्राथमिक आणि द्वितीयक प्रलेख सूक्ष्मपटांच्या स्वरूपात आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा खूपच वाढत्या प्रमाणातील वापरामुळे काही शास्त्रज्ञ भविष्यकाळ हे 'कागदरहित पुस्तक, नियतकालिकांचा काळ' आहे असे भाकित करू लागले. सूक्ष्मपट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वापरामुळे नव्या माहितीच्या संप्रेषणात खूपच सुधारणा झाली आहे, हे खरे आहे.

सूक्ष्मपट (मायक्रोफॉर्म्स) ही मूलभूत स्वरुपाची संज्ञा असून जे प्रलेख मुळात कागदांवर छापलेले होते आणि नंतर छायाचित्रणाद्वारे अतिसूक्ष्म स्वरूपात छायाचित्रित केले आहेत त्या सूक्ष्म छायाचित्रीत प्रलेखांना सूक्ष्मपट म्हणता येईल. असे सूक्ष्म छायाचित्रीत प्रलेख नुसत्या डोळ्यांनी वाचता येत नाहीत. त्यासाठी त्यातील मजकुराचा आकार मोठा करुन पडद्यावर वाचता येईल अशी प्रतिमा निर्माण करणारे मायक्रोफॉर्म रीडर लागतात. सूक्ष्मपटांचे मायक्रोफिल्म, मायक्रोफिश (आणि अल्ट्राफिश), मायक्रोओपेक मटेरियल आणि अपेर्चर

कार्ड हे चार प्रकार पडतात. यांपैकी मायक्रोफिल्म आणि मायक्रोफिशचाच वापर जास्त करून होतो. बऱ्याचश्या वाचकांना यांचा वापर करणे तितकेसे आवडत नसले तरी त्यातून खूप माहिती (मजकूर) अगदी थोड्या जागेत साठवता येत असल्याने जागेची प्रचंड बचत होते, सूक्ष्मपटातील प्रलेखांची किंमत कागदावर छापलेल्या त्याच्या प्रलेखाच्या (हार्ड कॉपी) ४० ते ५० टक्क्यांनी कमी असते, कित्येक प्रलेख (विशेषत: संशोधन अहवाल) केवळ सूक्ष्मपट स्वरूपातच उपलब्ध असतात, सूक्ष्मपट स्वरूपात नियतकालिकांचे अंक जतन केल्याने केवळ जागेचीच नव्हे तर बांधणीच्या खर्चाचीही बचत होते, बरेच उपलब्ध प्रलेख सुक्ष्मपटांच्या रुपातच वाचकांना उपलब्ध असतात. उदाहणार्थ, केसरीचे स्थापना वर्षापासुनचे अंक, काही दुर्मिळ आणि नष्ट होत चाललेले छापील साहित्य सूक्ष्मपटांवर छायाचित्रित करुन प्रदीर्घकाळ जतन करता येते, ह्या सर्व कारणांमुळे त्यांचा ग्रंथालयातून उपयोग केला जातो.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये ऑन लाईन कॉम्प्युटराईज्ड डेटाबेसेस आणि कॉम्पॅक्ट डिस्क-रीड ओनली मेमरी (सी.डी. रॉम्स) ह्या नव्या दोन शोधांमुळे 'माहितीचा संचय आणि प्रतिप्राप्ती' ची प्रक्रिया पूर्णत: बदलल्या आहेत.

डेटाबेसेसचे रेफरन्स डेटाबेसेस आणि सोर्स डेटाबेसेस हे दोन प्रकार आहेत. रेफरन्स डेटाबेसेसमध्ये छापलेल्या प्रलेखांची ग्रंथसूचीय माहिती जसे, ग्रंथकार व ग्रंथनाम, नियतकालिक नाव, खंड, वर्ष, पृष्ठे किंवा त्यांचे सार यांचा संग्रह संगणकात साठवून ठेवलेला असतो. दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे सोर्स डेटाबेसमध्ये मूळ प्रलेखांतील संपूर्ण मजकूर संगणकात नोंदवून ठेवलेला असतो.

ग्रंथसूचीय माहितीचा संचय करणाऱ्या डेटाबेसेसमध्ये केमिकल ॲब्स्ट्रॅक्टस, इंजिनीअरिंग इंडेक्स, इंडेक्स मेडिकस. ह्या महत्त्वपूर्ण सेवांचा समावेश होतो. हे डेटाबेसेस ज्या ठिकाणी संगणकात ठेवले आहेत, तेथील संगणकाशी आपल्या संगणकाचा सांधा टेलिकम्युनिकेशन यंत्रणेद्वारे टेलिफोनच्या साहाय्याने जोडता येतो आणि आपल्या संगणकाने त्या दूरवरच्या डेटाबेस धारण करणाऱ्या संगणकाला योग्य त्या आज्ञा देऊन त्यावरील पाहिजे ती माहिती आपल्याला मिळविता येते. या पद्धतीला 'ऑन लाईन सर्च' असे म्हणतात. डेटाबेस संगणकाशी केलेल्या संगणकीय संवादातून आपल्याला उपयुक्त विषयांवरील प्रलेखांची यादी मिळू शकते. सोर्स डेटाबेस वापरल्यास याच पद्धतीने मूळ प्रलेखांतील मजकूरही मिळू शकतो. सीडीरॉमचा शोध १९८५ मध्ये लागला. सीडीरॉम ह्या ४.७२" व्यासाच्या प्लास्टिकच्या तबकड्या असून त्यावर दोन लाख पन्नास हजार पानांचा मजकूर नोंदवता येतो. सी. डी. रॉम वाचण्यासाठी पर्सनल कॉम्प्युटरला एक सी. डी. रीडर यंत्र जोडावे लागते. सी. डी. रॉम डिस्कवर खोदलेल्या खाचा लेझर किरणांच्या साहाय्याने वाचल्या जातात.

सध्या कित्येक प्रकाशनांतील मजकूर सी. डी. रॉमवर उपलब्ध आहे. सुप्रसिद्ध ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीचे १६ खंड तीन सी. डी. रॉम्सवर उपलब्ध आहेत. अनेक निर्देश आणि सारसेवा आपली सेवा सी. डी. रॉमवर पुरवण्याच्या योजना करीत आहेत. तंत्रज्ञानातील सुधारणांमुळे कमी होत असलेल्या किंमती, किमान चुका, सी. डी. रॉमवरील माहिती प्रतिप्राप्ती करण्याचे सुधारलेले तंत्र, अधिकाधिक वाचकांची सी. डी. रॉमच्या वापराची मानसिक तयारी ह्या गुणांमुळे माहितीचा संचय, प्रतिप्राप्ती आणि प्रसारणाचे एक महत्त्वपूर्ण साधन ह्या कारणांमुळे सी. डी. रॉमचा वापर, माहितीचा संचय, प्रतिप्राप्ती आणि प्रसाराचे एक महत्वाचे साधन म्हणून खूपच वाढणार आहे.

दृक-श्राव्य माध्यम बनविण्यासाठी वापरलेल्या पदार्थावरुन त्यांचे फिल्मस, मॅग्नेटिक टेप्स, प्लॅस्टिक्स हे तीन प्रकार करण्यात येतात. फिल्म्समध्ये फिल्मस्ट्रिप्स,

स्लाइडस, सिनेफिल्म यांचा समावेश होतो तर मॅग्नेटिक टेप्समध्ये साऊंड टेप ह्या विभागात ओपन रीलस् व कॅसेट्स असतात आणि व्हिडीओ टेप्स ह्या विभागात ओपन रीलस् कॅसेट्स् असतात. प्लॅस्टिक्समध्ये पारदर्शी प्लॅस्टिक्स ह्या विभागात ग्रामोफोन रेकॉर्डस व्हिडीओ-डिस्क यांचा समावेश होतो.

संगणकाची प्रचंड संग्रहण क्षमता, गती आणि अचूकता या वैशिष्ट्यांमुळे संगणक वापर करण्याच्या दृष्टीने क्रांती झाली आहे. संग्रहण वैशिष्ट्यांसोबतच माहितीने जलद पुन:ग्रहण संगणकाद्वारे करता येते हे लक्षात आल्यामुळे ग्रंथालय संगणकीकरणाच्या आवश्यकतेला चालना मिळाली आहे.

ग्रंथालय संगणकीकरणाच्या इतिहासात डेटा प्रोसेसिंग साधनांचा वापर माहिती प्रक्रियेसाठी करण्याची सुरुवात इ.स. १९३५ च्या सुमारास अमेरिकेमध्ये सर्वप्रथम झाली. टेक्सास विद्यापीठाने पंचकार्डच्या मदतीने देवघेव करण्यास सुरुवात केली. इ.स. १९४१ मध्ये मॉन्टक्लेअर पब्लिक लायब्ररी न्यू जर्सी या ग्रंथालयाने त्यावेळचे उपलब्ध तंत्रज्ञान वापरुन देवघेव सुरु केली. इ.स. १९६० नंतर संगणकाचा वापर ग्रंथालयाच्या स्वयंचलित व्यवस्थापनाकरिता करण्यास सुरुवात झाली. उत्तर अमेरिका व ब्रिटनमधील ग्रंथालयानी संगणकाचा वापर करण्याचे दृष्टीने प्रथम पाऊल टाकले. एच. पी. लुहान यांनी इ.स. १९६१ मध्ये केमिकल ॲब्स्ट्रॅक्टमध्ये येणाऱ्या लेख शीर्षकासाठी की वर्ड इंडेक्स तयार करण्यासाठी संगणक कार्यक्रम विकसित केला. अमेरिका व ब्रिटनमधील संशोधन ग्रंथालये आणि विद्यापीठ ग्रंथालये यांनी संगणकीकरणारच्या दृष्टीने मोठी आघाडी मारली. सार्वजनिक ग्रंथालयांनीही ब्रिटनमध्ये यासाठी पुढाकार घेतला. लंडन येथील मेट्रोपॉलिटन बरोजने ग्रंथसंग्रहाचे तालिकीकरण करण्यासाठी इ.स. १९६५ मध्ये मान्यता दिली. चार बरोजतर्फे या कार्याची सुरुवात करण्यास आली. ग्रंथालय संगणकीकरणाच्या दृष्टीने ग्रंथदेवघेव आणि तालिकीकरण हे क्षेत्र प्रथम निवडण्यात आल्याचे आढळून आले. इ.स. १९६४ मध्ये ग्रंथवर्णनात्मक डेटा बेससाठी संगणकाची उपयुक्तता प्रथम लक्षात घेण्यात आली.

संगणक तज्ज्ञ ग्रंथालयशास्त्र व ग्रंथालयाच्या कामाचे स्वरूप याबद्दल अनभिज्ञ असतात. ग्रंथालयांच्या समस्याबाबत त्यांना ज्ञानही नसते. त्यामुळे ग्रंथालयांच्या संगणकीकरणामध्ये येणाऱ्या अडचणी व प्रश्नांना फारसे गांभीर्याने घेणे त्यांना आवश्यक वाटत नाही. त्यामुळे त्यांनी तयार केलेली संगणक प्रणाली ग्रंथालयांसाठी अपुरी व महागडी ठरली. ग्रंथालयांच्या कार्याची वास्तविकता लक्षात आल्यावर अपेक्षित उद्दिष्टांच्या दृष्टीने वाटचाल सुरु होण्यासाठी एक दशक जावे लागले. दूरसंचार संप्रेषण क्षेत्रांत इ.स. १९७० नंतर क्रांती झाली. या क्रांतीमुळे ग्रंथालय संगणकीकरणाच्या विचार गृह कार्यापुरता मर्यादित राहिला नाही. दूरसंचार संप्रेषणाच्या सोयीमुळे ओहिओ कॉलेज लायब्ररीसाठी विकसित केलेले ग्रंथालय सेवेचे जाळे संपूर्ण उत्तर अमेरिकेतील ग्रंथालयापर्यंत वाढत गेले. त्यातूनच आताचे ऑन लाईन कॉम्प्युटर लायब्ररी सेंटर (OCLC)अस्तित्वात आले. इ.स. १९७४ मध्ये येल, कोलंबिया आणि हावर्ड विद्यापीठ आणि न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी यांनी एकत्र येऊन रिसर्च लायब्ररी ग्रुप (RLG) स्थापन केला. इ.स. १९७८ मध्ये या ग्रुपने आपापसांतील सहकार्यासाठी सामान्य तांत्रिक कार्य प्रणाली तयार केली. रिसर्च लायब्ररी इन्फर्मेशन नेटवर्कचा (RLIN) जन्म यातूनच झाला. या सहकारी तत्त्वावरील जाळ्यामुळे इतरही नेटवर्क विकसित होण्यास सुरुवात झाली.

इ.स. १९८० नंतर मायक्रोकॉम्प्युटर्सचा विकास झाल्यामुळे ग्रंथालय संगणकीकरणाच्या मागणीमध्ये वाढ

झाली. सी. डी. रॉम तबकड्यांच्या उपलब्धतेमुळे माहिती संग्रहण क्षमतेध्ये वाढ झाली आहे. एका सी. डी. रॉम तबकडीवर २,७५,००० पृष्ठे मजकूर साठविता येतो. नवीन आलेल्या डिजिटल ऑप्टिकल तबकड्यांची संग्रहण क्षमता यापेक्षा जास्त आहे. या उपलब्धीचा जास्तीत जास्त फायदा ग्रंथालयांना होणार आहे. ग्रंथालयांच्या संगणकीकरणाच्या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. कागदविरहित समाजाकडे आपली वाटचाल सुरू आहे असे म्हटले जात आहे. परंतु ग्रंथ व कागद यांना योग्य तो पर्याय अद्याप उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे ग्रंथालयांच्या सेवा विकसित करण्याच्या दृष्टीने संगणकाचा वापर करणे याला निश्चित महत्त्व प्राप्त झाले आहे हे निश्चित.

ग्रंथ निवड आणि ग्रंथ संपादन (Book Selection and Acquisition), तालिकीकरण (Cataloging), कालिके व नियतकालिके निवड, संपादन आणि नियंत्रण (Serials and Periodicals Selection, Acquisition and Control) , देवघेव नियंत्रण (Circulation Contorl), माहिती पुनर्ग्रहण सेवा, (Information Retrieval Services) प्रशासकीय कार्य इत्यादी क्षेत्रांमध्ये ग्रंथालय संगणकीकरणाद्वारे विकास घडवून आणू शकतो.

विशिष्ट माहितीच्या शोधासाठी दिशादर्शक साधन म्हणून निर्देशसूच्या उपयोगी ठरतात. एच. पी. लुहानांनी (KWIC) निर्देशसूची प्रणाली इ.स. १९६१ मध्ये विकसित केली. मराठीमध्ये मराठी नियतकालिकांची सूची, मराठी अनुवादित साहित्य सूची, ज्ञानदेव वाङ्मय सूची, ज्ञानोदय सार सूची, सत्यकथा सूची यासारखी साधने छापील स्वरूपात उपलब्ध आहेत. ही साधने संगणकीय माहिती पुनर्ग्रहण सेवेसाठी सीडी रॉमसारख्या अद्ययावत माध्यमावर येतील अशी आशा करण्यास हरकत नाही. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकाला कोणत्याही साधनांमधून माहिती उपलब्ध करून देणे असे माहितीसेवेचे आजचे स्वरूप आहे. संगणक व दूरध्वनी यांच्या मदतीने माहितीसेवा देण्याचे युग आले आहे. संगणकाच्या ऑनलाईन सेवेमुळे विकसित झालेले इंटरनेट आज लोकप्रिय झाले आहे. मिहती पुनर्ग्रहण सेवे अंतर्गत वार्तापत्रे, मूल्यमापन अहवाल तयार करून देण्यासाठी संगणकाचा उपयोग होतो. ग्रंथ व कालिके यांच्या अनुक्रमणिकांची सूची ही तयार करून ऑन लाईन देता येते.

मायक्रोकॉम्प्युटर्ससाठी तयार करण्यात आलेली अत्याधुनिक व्यवस्थापकीय सॉफ्टवेअर पॅकेजस बाजारात उपलब्ध आहेत. प्रशासकीय कार्याच्या दृष्टीने What you see is What you get पध्दतीने कार्य करणारे डेस्क टॉप पब्लिशिंग हे युजर्स पॅकेजही उपयुक्त आहे. मायक्रोसॉफ्ट ऑफिस हे तयार पॅकेज प्रशासकीय कार्यासाठी परिपूर्ण आहे. कारण या पॅकेजमध्ये प्रशासकीय कार्यांकरिता लागणारे वर्ड, प्रोसेसर, स्प्रेडशीट, स्लाईडस इत्यादीसारख्या सर्व सोयी आहेत. या कार्याशिवाय ग्रंथपरिगणन करणे, परिगणन अहवाल तयार करणे, न सापडलेल्या ग्रंथांच्या याद्या तयार करणे यासाठीही संगणकाचा वापर करता येतो. ग्रंथालय व माहिती सेवेचा राज्यस्तरीय विकास करण्यासाठी सर्व सार्वजनिक ग्रंथालयांनी एकत्र येऊन संगणकाचा वापर आणि कागदविरहित ग्रंथालयाचा वापर सुरू करणे ही आता काळाची गरज आहे.

**श्री. योगानंद दादाजी अहिराव**

एन. एम. एम. सोसायटी
बिल्डींग नं. ९, रुम नं. ६, विंग. अ
मुंबई - पुणे रोड,
कळवा (पश्चिम)

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*मूर्ती, प्रतिमा प्रतीके यांच्या मानवी संस्कृतीवर खोलवर परिणाम झाला आहे. त्यामागील सामाजिक मानसिकता व त्या अनुषंगाने केलेले हे चिंतन.* - संपादक

## मूर्ती , प्रतिमा व प्रतीके


राजस्थान सरकारच्या मुख्यमंत्री माननीय श्रीमती वसुंधरा राजे ह्यांची 'अन्नपूर्णा देवी' ह्या स्वरुपांत, अटलबिहारी वाजपेयी, अडवानी व राजनाथसिंग यांची ब्रह्मा, विष्णू व शंकर (रुद्र) ह्या रुपात, अशी प्रतिमा, दाखवणारी पोस्टर्स, भारतीयजनता पार्टीच्याच एका सदस्याने प्रसृत केली. त्यावर अर्थातच खळबळ माजली व वृत्तपत्र 'मीडियामध्ये' रकानेच्या रकाने लिहिण्यांत आले



चित्र नं. १ वसुंधरा राजे - अन्नपूर्णा देवी स्वरूप

याच सुमाराला महाराष्ट्र सरकारचे मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांचे 'भगवान कृष्ण' या अवताराने दर्शवणारे पोस्टर्स महाराष्ट्रात लावण्यात आले.

पंजाबमध्ये बाबा गुरमित राम रहीम सिंग ह्या ''सच्च्या सौदा'' संप्रदायाच्या नेत्याने 'गुरु गोविंद सिंग' ह्या शीख समाजाच्या थोर पुरुषाच्या वेषात 'अमृत' वाटले. त्यावर, सबंध पंजाब पेटले व अकाली दलाचे अनेक कार्यकर्ते लाखोंच्या संख्येने, तलवारी वगैरे घेऊन, रस्त्यावर उतरले. अजूनही हा लढा व उद्रेक पूर्णपणे थांबला नाही.




चित्र नं. २

एम्. एफ्. हुसेन ह्या जगप्रसिद्ध चित्रकाराने हिंदू देवतांची जी बीभत्स व कामुक चित्रे, अमेरिकेतील एका प्रसिद्ध म्यूझियममध्ये प्रदर्शनात ठेवली, त्याचा प्रचंड निषेध व कायद्याच्या माध्यमातून प्रतिकार झाला. त्यांच्याच 'सरस्वती' ह्या देवतेचे अर्धनग्न पेंटिंग व माधुरी दीक्षित, ह्या प्रसिद्ध बॉलीवूड 'नटी-सदृश्य' दिसणाऱ्या या चित्राचा, हलकल्लोळ व प्रत्यक्ष त्या पेंटिंग्जची जाळपोळ विश्व हिंदू परिषदेच्या बजरंग दलाने केली, हे मुद्दा आपण बघितले आहेच.

महंमद पेगंबर ह्यांच्या नांवे स्वीडन मधील एका

व्यंगचित्रकाराने काढलेल्या चित्रावरही सबंध मुस्लिम देशांतील लोकांकडून प्रचंड निषेध व त्याला मारण्याचे फतवे निघाले, हेही आपण बघितले. सलमान रश्दी याने लिहीलेल्या पुस्तकावर ("Satanic Verse") - झालेल्या प्रचंड प्रतिक्रिया व इराणच्या धर्मगुरुने काढलेले 'मृत्युदंडाचे फर्मान', आपण बघितले आहेच. अमिताभ बच्चनला 'देवाचे अवतार' व आता 'फार्मर Farmer, शेतकरी' हे पद चिकटविलेले आपण पाहिलेच. त्याचा मेणाचा पुतळा इंग्लडमध्ये म्युझियममध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे हे आपल्याला माहीत आहेच. शेतकरी, 'बिग बी' ही दोन चित्रे विसंगत का वाटतात?

नरेन्द्र दाभोळकर हे अंधविश्वासाच्या निर्मूलनासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत, हे आपण वाचतोच आहोत. त्यांत मूर्तीपूजेचा निषेध अनुषंगाने आलाच आहे. त्यांचे गुरु शास्त्रज्ञ जयंत नारळीकर!!

प्रसिद्ध शास्त्रज्ञ 'जयंत नारळीकर' ह्यांनी पुण्याच्या सायन्स इस्टिट्युटमध्ये **'न्यूटन' चा 'पुतळा'** बसवण्यासाठी जे आटोकाट प्रयत्न व तो (पुतळा) अर्थपूर्ण होण्यासाठी, त्याच्या मागे **'ॲपल(सफरचंद) याचे झाड'** लावण्याचा, जो अपूर्व 'शास्त्रीय प्रयत्न' केला त्याचे वर्णन आपण पाहिलेत. हे झाड त्यांनी एका लाकडी बेंच पासून संपादिले. कारण, ज्या मूळ झाडापासून सफरचंद खाली पडतांना ऐझॅक न्यूटनने पाहिले व गुरुत्वाकर्षणाचा शोध केला, ते 'ऐतिहासिक झाड' आस्ट्रेलियात, एका लाकडी बेंचच्या स्वरुपांत सांपडले. तेव्हा न्यूटन व ॲपल ही शास्त्रीय प्रतीके (Symbol) झाली. त्यांना जतन करण्यासाठी त्या बेंचपासून एका शास्त्रीय प्रयोगांतून पुण्याला 'वृक्षात रुपांतर' झाले. हा वृत्तांत टाईम्सच्या वृत्तपत्रात संपादकीय पानांत दोन भागांत, प्रसिद्ध झाला. ह्या झाडाला सफरचंद लागेल का? हा प्रश्न जयंत नारळीकरांना विचारला, त्याचे उत्तर जाहीरपणे 'नाही असे दिले गेले. मग ह्या उपक्रमाचा उद्देश काय? ह्या पुतळ्यापासून (मूर्ती म्हणूया-नाही कां?) तरुण पिढीला **'विज्ञान निष्ठा'** प्राप्त होतील असे उत्तर टाइम्सच्या लेखांत छापण्यांत आले होते. ही 'शास्त्रीय' प्रक्रिया पुतळ्यापासून कशी होते?

जागोजागी अनेक राजकीय, भारतीय पुढाऱ्यांचे व ऐतिहासिक व्यक्तींचें पुतळे मोठ्या समारंभाने व कित्येकवेळा 'सरकारी खर्चाने' उभारले जातात.

त्या पुतळ्यांची 'विटंबना' मधूनमधून होतेच. मग, एक शस्त्रधारी हत्यारी हवालदार त्याच्या संरक्षणासाठी ठेवला जातो-सरकारी खर्चाने!!

ही यादी मला जास्त लांबवायची नाही!! पण, मुद्दा लक्षात आला असेलच!!

मानवी जीवनांत ह्या 'सिम्बॉलस', प्रतिमा , चित्रे, प्रतीके यांचा वापर व अंतर्भाव किती व त्याचा प्रभाव किती हे पहातो आहोत.

## प्रतीकांचे संघर्ष युद्ध

असाच आणखी एक किस्सा!!

सच्चा सौदा, गुरु गोविंद सिंग, जर्नाइला सिंग भिन्द्रनवाले, 'अकाल तख्त' ह्या विषयांच्या संदर्भात श्री. जगमोहन भसिन हे वार्ताहार आपल्या ता. २९ मे २००७ च्या टाईम्स मधील लेखात लिहीतात-

**"Clash of Symbols"**

"The Sacha Sauda leader understands the **role of symbols in the collective psyche.**

To a great extent the earlier Arya Samaj movement, the Nirankari and now the sacha sauda movements, instead of concealing ostensibly hidden agendas are

voicing aspirations of .........

"For ordinary sikh, Guru Gobind Singh Symbolises purity of thought and action to which he can only aspire in a life time. A slur on this SYMOLISM would always be perceived as a threat to reason for existence to the 'Sikh Identity' and mobilises them towards confromtation".

आपले जगातले जे 'राष्ट्रध्वज' आहेत त्यांचा सन्मान व संरक्षणासाठी घटना व कायद्यात तरतूद आहे. त्यांच्या प्रतिमा जर नजरचुकीनेसुद्धा विकृतपणे दर्शविण्यात आल्या तर त्या जबाबदार व्यक्तीवर कायदेशीर शासनाची क्रिया करण्यात येते. कां बरे?

अनेक देवळे, मशिदी, चर्च, प्रार्थनास्थाने यामध्ये त्या त्या धर्माच्या संहितेप्रमाणे, श्रद्धेप्रमाणे अनेक तऱ्हेच्या प्रतिमा, प्रतिके व साधने असतात. काश्मीर मधील पवित्र केस, चादर, तलवार, त्रिशूळ, स्वस्तिक, चंदनाचे व भस्माचे पट्टे, तिलक, भगवी वस्त्रे वगैरे वगैरे प्रतिके अत्यंत जागृतपणे व आजही या शास्त्रीय, औद्योगिक पुढारलेल्या जगात डोळ्यात तेल घालून संभाळली जातात. नवीन नवीन निर्माणही केली जातात. कां बरे?

## प्रतीक प्रतीके व मानसिकता

ह्या प्रचंड प्रतिक, मूर्ती, प्रतिमा ह्यांना हे विशेष स्थान का प्राप्त झाले व त्यांचा विशिष्ट मानवी समूहात कोणता 'मानसिक अधिकार' मानला जातो?

ह्याचा मूलभूत तलास घेणे आवश्यक ठरावे!!

## Symbols and Western Cultural Analysis

प्रथम मी पाश्चात्य संस्कृतीमध्ये ह्याबद्दल काय विचार होतो आहे याचे काही नमूने मांडणार आहे Earnst Cassier (1874-1945) हा जर्मन फिलॉसॉफर आणि इतिहासतज्ज्ञ पण वैचारिक तत्त्वमीमांसेचा!! "The philosophy of Symbolic forms" (1923)" हे त्याचे प्रसिद्ध पुस्तक! काय याचे भाषांतर होऊ शकेल? 'रुपक संज्ञांचे तत्त्वज्ञान'!! पण, मूळ इंग्रजीतीलच त्याचे (विशेष) अवलोकन - मतप्रदर्शन वाचू या. ते महत्त्वाचे आहे. "Man, has, as it were, discovered a new method of adopting himself to his enviornment. Between, the 'Receptor System' and the 'Effector System'', which are to be found in all animal Species, we find in man a third link, which we may describe as the 'Symbolic System'. This new acquistion transforms the whole of human life. As compared with the other animals man lives not merely in a broader reality, he lives, so to speak, in a new dimension of reality (An essay on Man 1944)!!

''माणसाने, असे दिसते की, भोवतालच्या परिस्थिती व वातावरणाशी जमवून घेण्याचे किंवा संलग्न होण्याचे तंत्र शोधून अवगत केले. प्राणी सृष्टीमध्ये सांपडणाऱ्या 'प्रक्षेपण यंत्रणा' व 'स्वीकारणारी यंत्रणा' ह्या दोघांमध्ये एक तिसरी कडी किंवा दुवा त्याने शोधला आणि आणला, तो म्हणजे 'प्रतीक' किंवा 'संज्ञारुप यंत्रणा'. ह्या नवीन प्राप्तीमुळे माणसाचे सबंध आयुष्यच बदलून गेले.

आतां इतर प्राणीसृष्टीच्या तुलनेने माणूस केवळ बहिर्गत सामान्य वास्तवांतच जगत नसून, एका अर्थाने बोलावयाचे तर एका नव्या दिशेच्या व मापदंड असलेल्या वास्तवात जगू लागला (माणसावर निबंध १९४४)

## तिसरी यंत्रणा

याचा अर्थ असा की इंद्रिय ज्ञानानी प्रतीत होणारी यंत्रणा ही जर 'स्वीकारणारी यंत्रणा' संबोधित केली व इंद्रियांच्या ज्ञानाचा जो विषय आहे, वस्तू आहे तिला

'प्रक्षेपण यंत्रणा' म्हटली, तर प्राणी जगतात फक्त एवढी हीच Object आणि Subject अशी देवाण घेवाण आहे.

पण माणसाने त्यामध्ये एक 'Symbol' 'आलंबनात्मक', चिन्हासारखी, खूणेसारखी, प्रतिकासारखी, प्रतिमेसारखी आणखी एक **'तिसरी यंत्रणा'** उभी केली.

उदाहरणादाखल, आपण वरील घटनांची चित्रेच तपासू. देश किंवा राष्ट्र याची सरळ कल्पना न करता, त्याचा एक 'राष्ट्रीय ध्वज' तिरंगा झेंडा ही चीज त्या देशाच्या मानाचे, संबोधनात्मक Symbol चिन्ह निर्माण केले त्यामुळे ऑलिंपिकमध्ये जेव्हा खेळाडू जिंकतात तेव्हा **'ध्वजाची मान'** उंचावते नाही का? आणि वर्ल्ड क्रिकेट मध्ये मानहानीगत पराभव होतो तेव्हा हा **ध्वज 'अर्ध्यावर'** उतरवण्याची मानसिकता निर्माण होते. **प्राणीसृष्टीमध्ये असा काही प्रकार दिसत नाही.**

**यंत्रणेचा परिणाम**

तेव्हा आता आपण या तिसऱ्या यंत्रणेचा माणूस ह्या प्राण्यावर काय व कसा परिणाम होतो ते पाहू या.

एखादे चित्र पाहिले की त्याच्याबद्दल स्मृती आणि पूर्वस्मृती (पूर्वजन्माची सुद्धा) जागृत होऊन त्या माहिती किंवा ज्ञानाच्या बैठकीवर किंवा दुसऱ्या बाजूला पूर्वग्रहावर, गैरसमजूतीवरही, एक मानसिक प्रतिक्रिया निर्माण होते. मग त्या प्रतिक्रियेच्या प्रत्यक्षीकरणात एक शारीरीक क्रिया (Physical Action) होते. ती सात्विक, राजसिक किंवा तामसिकही असू शकते!!

प्रश्न महत्वाचा हा की, शरीराच्या बाहेर, दृश्य (किंवा अदृश्यही) वस्तू चित्र, प्रतिमा, भाषा, चित्रपट, निसर्ग वगैरे ह्या एखाद्या मानसिक प्रतिक्रियेला (माणसाच्या शरीर व मनांत) उत्पन्न करतात-चिथावतात-उद्युक्त करतात. हा संबंध व नाते कोणत्या तत्वावर आधारित आहे? ही यंत्रणा, शरीरांत, मनात, बुद्धीमध्ये की कॉंशसनेसमध्ये, की निसर्गांमध्ये, अस्तित्वात आहे?

तिचा 'Programme' प्रोग्रॅम कोणता, कोणी लिहीला? त्याचे Script स्क्रिप्ट् कोणाचे? त्याचे स्वरुप व लक्षण काय?

**सुसान लँगर**



सुसान लँगर Susanne Langer ही एक विशेष ज्ञानाच्या अधिकाराची फिलॉसॉफर आहे. तिचे "Feeling and form, A Theory of Art Developed from philosophy in a New Key (routledge and Kagan Paul, London 1953 नावाचं पुस्तक प्रसिद्ध आहे.

त्यांतील हे वर्णन बघा-

''Shaping inner life''

''The act of intution is an act of Perception, Where by the Content is formed, tuned into form, a work of art is essentially in the Artist's mind..... there is an intuited Gestert..... there is contemplation of the complexities, Simplicities, import ..... meaning is synthetically construed ...... there is candid

envisagement - there is clarification and organisation of the intution ..... in the process the reader's imagination of external reality can, in fact, be shaped..... a revelation can occur to the reader's inner life........ because of some fresh formulation of their felt life which is at the heart of their own culture. "

ह्या विशेष भाष्याचे भाषांतर - कठीण आवश्यकही आहे. पण बघू या :-

"साक्षात्कारी प्रतिभा, ही एक विशेष दृष्टी किंवा-दर्शनाची क्रिया आहे- जिच्यामुळे खरा आशय प्राप्त होतो, आणि त्याचे एका विशिष्ट सुसंगत, सुसंवद्ध स्वरुपात चित्रात रुपांतर होते!! कलेचे प्रत्यक्ष चित्रण/रुप ही कलाकाराच्या मनांतीलच प्रतिक्रिया व अभिव्यक्ती असते. हा एक अविष्काराचा उत्स्फूर्त 'गेस्टाल्ट' (Gestalt-German Word)असतो. गुंतागुतीचा, सहज सोपेपणाचा महत्व दर्शवणारा तिथे एक चिंतनाचा भाग असतो!! त्याचा सोपपत्तिक, संयुक्त, समन्वयी, सम्यग अर्थ तिथे बांधला किंवा रचला जातो!! तिथे, एक प्रामाणिक, पारदर्शी कल्पनाचित्र बांधले जाते, आणि साक्षात्कारी प्रतिभेची - एक विशेष अर्थप्राप्ती व रचना घडत असते."

एका सृजनात्मक पद्धतीने वाचक किंवा प्रेक्षकाच्या कल्पनाचित्राची मनातच 'बहिर्गत वास्तवाचे' विशिष्ट निर्मीती व स्वरुप बांधले जात असते. कारण काय ? तर, एक नवीन स्वरुपाची रचना, जी त्याच्याच अनुभूतीतील आयुष्याची असते, आणि ती सुद्धा त्याच्या स्वत:च्या हृदयात सांठवलेली किंवा दडलेली असते.!!

ह्या शब्दांकनाचे महत्व हे की - ज्याला (discursive Knowledge म्हणजे Proceeding to a conclusion by reason or argument rather than intution) 'डिस्करसिव्ह ज्ञान', म्हणजे बुद्धिप्रामाण्य व वादविवाद या मार्गाने निर्णय काढतात व त्याला सर्वसाधारणपणे ज्ञान म्हणतात. पण हे साक्षात्कारी अंतर्ज्ञानाने प्राप्त झालेले ज्ञान नव्हे!!

पण, ह्या बुद्धिप्रामाण्य ज्ञानाला आणखी एक विदुषी **'ब्रेट बॅटे' (Bret Battery)** ह्या श्रेष्ठ किंवा सत्य ज्ञान मानावयाला तयार नाहीत. त्या म्हणतात "In Contrast, I am Inclined to acknowledge and honour the existence of knowledge that connot be expressed directly in prose."

"ह्या विरुद्ध, माझा कल हा खऱ्या ज्ञानाला लिखित साध्य शब्दानध्ये पकडता येत नाही, ह्या मताकडे आहे.

ह्या विदुषीचे लिखाण "**Language Gesture and Music**" - 'भाषा, हावभाव खुणा व संगीत' ह्या विषयावर आहे. त्यामुळे ह्या प्रातांत जे विचारवंत आहेत त्याचे एक स्पष्ट मत आहे. भाषा ही शब्दांवर आधारलेली असते'आणि 'हावभावात्मक भाषा' ही हालचाल, अविर्भाव, मुद्रा, हातवारे, शरीराच्या हालचाली व 'बॉडी लॅंग्वेज' ह्यावर आधारलेल्या असतात. ह्याचे मुख्य कारण म्हणजे शब्दातून जो विचारांचा आशय व सुप्त विचारांचा किंवा अंतर्भावाचा विचार, पूर्णपणे व्यक्त होत नाही व अपूरा रहातो, तो ह्या 'गेश्चर' ने व्यक्त होतो किंवा करण्याचा प्रयत्न होत असतो!!

ह्या बहीर्गत वस्तू, चित्रे, चिन्हे, प्रतिमा, प्रतीके, हावभाव, हातवारे, आवाज, घोषणा, मूर्ती, पुतळे, जाहिराती, मोर्चे घोषणा ह्या अनेक प्रकारांतून जे संकेत किंवा भाषा व्यक्त केल्या जातात त्यांचा मानवी मनावर व समूहावर काय परिणाम होतो, हा अभ्यासाचा विषय आहे.

ह्या संज्ञांचे रुपांतर ज्या भावना उद्रेकांत होऊ शकते त्याचे सिद्धान्त आजही आपल्याला पूर्णपणे ज्ञात नाहीत.

## तुलनात्मक परिचय


पाश्चिमात्य मानसशास्त्रात त्याचा गंभीरपणे अभ्यास चालू आहे. त्याचा संपूर्णपणे परिचय करणे, या छोट्या लेखांत योजिला नाही व जमणार सुध्दा नाही. पण, त्याच्या तुलनेने भारतीय वैदिक ज्ञानात त्याचा काय संदर्भ दिसतो व त्या शास्त्राचा उपयोग कसा केला जातो हे बघणे आपले उद्दिष्ट आहे.

याचे मुख्य कारण अगोदरच सांगतो. पूर्व व पश्चिम ह्या दोन भिन्न संस्कृतीमध्ये, एक मोठा फरक असा आहे, की पश्चिम संस्कृतीमध्ये प्रामुख्याने भौतिकवादी सिद्धातांमध्ये विचार केला जातो, तर पूर्व व विशेषत: भारतीय व वैदिक विचार पद्धतीत स्पिरीच्यूअल वा 'आध्यात्मीक जीवन दृष्टीमध्ये' ह्याच, परिस्थितीचा 'इंटिग्रल' वा एकात्म' विचार केला जातो. त्यामध्ये, दृश्य, अदृश्य व्यक्त अव्यक्त, बुद्धी, अहंकार, वृत्ती, संस्कार, पूर्व जन्म, वैदिक विश्वरचना जीवात्मा व मर्त्यशरीराच्या मर्यादा, प्रकृती पुरुष यांचा समन्वयी परिणाम वगैरे वगैरे, काही ज्ञात व काही गूढ पद्धतीने, विचार व विनीयोग केला जातो.

## 'गेस्टाल्ट व्हयू'


त्यापूर्वी वर बेऊन गेलेल्या 'Gestalt' गेस्टाल्ट सायकोलाजी व थियरीच्या उल्लेखावर काही जास्त विचार करु या. कारण ही पद्धती फारशी माहीती नसलेली पण आपल्या चिंतनाला जास्त चालना देणारी इतकी महत्वाची आहे.

ही थियरी 'बर्लिन स्कूल' ह्या विचार संप्रदायाची आहे. मन व मेंदू यांचे वर्तन 'Holistic' असते व डिजीटल कॉम्प्युटरच्या सारखे 'Atomistic' नसते. ह्या मुद्याकरिता एक नेहमीचे लोकप्रिय उदाहरण ते देतात. बुडबुडा हा उगम पावतो व त्यानंतर त्याचा सर्व अंगानी विस्तार होतो, तो काही कुठल्या गणीती सिद्धांताच्या चौकटीच्या पक्क्या बैठकीवर व निश्चित फॉर्म्यूलावर होत नाही. प्रत्येत सेकंदा सेकंदाला प्राप्त परिस्थिती, वातावरण, 'सरफेस टेन्शन' (पृष्टभागावरचे ताण) ह्या सतत बदलणाऱ्या परिस्थितीवर त्या बुडबुड्याचा आकार, रुप व विस्तार होत जातो. हा आहे 'गेस्टाल्ट व्ह्यू' पण, मानवी मनाची, बुद्धीची, मेंदूची जी कार्यपद्धती आहे ती कुठल्या तत्त्वावर आपल्या जाणीवा स्वीकारते आणि बदलते ते अजूनही पूर्णपणे आकलन झालेले नाही. त्या आकलन पद्धतीचे 'गेस्टाल्ट थियरी' मध्ये जे काही आडाखे वा अंदाज आज मांडण्यात आले आहेत ते आपल्या अभ्यासाला आवश्यक ठरावेत.



चित्र नं. ४


हे 'Emergence' नावाचे ह्यात अस्ताव्यस्त ठिपके व रंगाचे फरकारे आहेत. पण त्यांतून एक तोंड खाली वांकवून एक कुत्रा - आपल्याकडे पाठ असलेला आहे असा आभास तुमच्या मनाला होईल. त्याचे शेपूट, कान, पाय असे सर्व अवयव स्पष्ट दिसणार नाहीत तरीही तुमचे मन त्यावर वा अपूर्णतेवर मात करुन-तुमच्या मनातील कुत्र्याच्या शरीराच्या 'ज्ञानावर', ह्या चित्रांत नसलेल्या गोष्टी पुरवल्या जातील व चित्र पुरे होईल हे असे का व्हावे?




चित्र नं. ५ 'Reification'

Reification ह्यात चित्र नं.५ काढलेले त्रिकोण (पांढरे), पांढरा फूटबॉलसारखा गोळा (त्रिमितीचा ३ Dimensional दिसेल.


पुढच्या चित्रात तुटक दोरीसारखा तुकड्यातून नागमोडी दोर पैदा होईल. असे कां व्हावे? तुमचे मन असा प्रयत्न कां करते?



चित्र नं. ६ 'Mulistability'

Mulistability

ह्यामध्ये एकाच चित्रामधून दोन किंवा जास्त असे रूपदर्शन होते. असे कां व्हावे? एकाच चित्राचे दोन अर्थ किंवा रूपे कां प्राप्त व्हावीत?




चित्र नं. ७ 'Invariance'

ह्या चित्रांत जे ठोकळे दाखविले आहेत ते अस्ताव्यस्त, निरानिराळ्या आकारात, प्रकाशात पडले आहेत. पण त्यातही आपण काही सुसूत्रता बघू शकतो. 'A' मध्ये ठोकळ्यांची मूळ डिझाईनची समानता. 'B' चित्रातील ठोकळ्याची असामनता. 'C' **चित्रातील** व 'D' चित्रातील ठोकळ्याची थोडी ओढाताण केलेली रूपे किंवा त्यांना निरनिराळ्या 'ग्राफिक पोझिशन' मध्ये दाखवूनही समानता ओळखणे वा शोधणे ह्या मानसिक क्रिया घडतील. ह्या कां घडाव्या?

असा कोणता 'मानसिक व्यूह' वा 'यंत्रणा' आहे की जिच्या आधारावर हे 'ज्ञान' प्राप्त होते? हा विचार महत्त्वाचा आहे. कारण बहिर्गत वस्तूंच्या रचनेतून हा ज्ञानाचा विशेष पृथक्करणीय संकेत मिळत नसून, तो तुमच्या मनाची स्थायी भावात्मक शक्ती आहे!!

१) Principle of Totality पूर्णता तत्व आलेल्या अनुभवांचा पूर्णत्वाने विचार. कारण, मानवी मनाची मूलभूत मागणी ही आहे की प्रत्येक भागाचा संपूर्ण यंत्रणेशी संबंध दिसला पाहिजे. प्रत्येक भाग हा एक संबंध शरीराचा (पुरुष- पुरुषसुक्त, ऋग्वेद) अवयव घडला पाहिजे. व त्याचा 'एकात्म' संबंध असावयाला हवा.

२) **Principle of Psychophysical homorphism**

मानस शारिरीक एकात्मता - म्हणजे कॉशसनेसला आलेला अलग अनुभव, अनुभूती यांचे परस्पर नाते व संबंध असावयाला हवेत.

असे अनेक नियम हे मानवी मनाच्या स्थायी 'रचनायंत्रांचा' अविभाज्य भाग आहेत.

गेस्टाल्ट थियरी मध्ये हे नियम व त्याची अपेक्षीत रचलेली अर्थ प्राप्ती या यंत्रणे वरहुकूम होते ती केवळ चित्रे, दृश्य, प्रतिमा, प्रतिकृती, हावभाव यांचीच नव्हे तर निरनिराळ्या विचार प्रवाहांच्या बाबतीही लागू पडते.

**भारतीय सांस्कृतीतील विचार**

हा सगळा अभ्यासच फार महत्त्वाचा आहे.कारण, भौतिकतेच्या प्रांतात होणाऱ्या अनंत घटना, विचार प्रवाह. उलाढाली, ह्यांचा मानवसमूह कोणत्या पद्धतीने अर्थ लावतो किंवा ज्ञान मिळवतो किंवा स्वतःच्या उन्नतीसाठी वापर करतो, हा कुठल्याही संस्कृतीचा यक्षप्रश्न आहे. त्याचा पुरता अंदाज राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक चळवळींना लागलेनी नाही. म्हणूनच जगाची वाटचाल ही 'योजनाबद्ध शहाणपणाने' होत नाही आहे.

मग, भारतीय वैदिक ज्ञान पद्धतीने व संस्कृतीमध्ये त्यावर काय विचार झाला आहे. ते पाहू या. आपण, सामाजिक व्यवहारामध्ये आजही समाज अनेक सिम्बॉलसचा वापर करतो व त्यावर आपल्या अनुकूल किंवा प्रतिकूल किंवा हिंसक, तामसी भावनाही व्यक्त करतो. हा बाहेरील symbols व मानवी मनाचा कोणता संबंध आहे?

मग, आता अध्यात्म क्षेत्रात तर आणखी गहन प्रश्न आहे. व्यक्त व अव्यक्त जगाच्या संबंधात ज्ञान मिळवण्यासाठी मानवी मनातील सूक्ष्म शक्तीची जरुरी व सिद्धता आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर हे मानवी मन ज्या निसर्गदत्त निर्मिती तत्त्वाने आपल्या मर्त्य शरीराला प्राप्त झाले आहे. त्याची सामर्थ्यशक्ती उंचावली व क्षमता जर ह्या ज्ञानसंपादना अनुकूल झाली, तर फायदाच फायदा आहे. योगसाधनेने हे होऊ शकते !!

व्यक्त व अव्यक्त जगातील वस्तू, चिजा, विचार संच, हे जरी वेगवेगळे असले, तरी त्यांना एकमेंकाशीं त्यांच्या 'सर्वांच्या निर्मितीच्या', एकाच सूत्रामध्ये, अतूट संबंध आहे. एकाचे वैश्विक शक्तीच्या सृजन क्रियेने त्यांचा जन्म वा अवतार ह्या विश्वात, पृथ्वीवर, प्रकृतिमध्ये, प्राणी व वनस्पती सृष्टीमध्ये झालेला आहे. ह्याला Involution सृष्टी क्रिया म्हणतात.

त्याची वैश्विक एकात्म भाषा ही '**छंद**' आणि ''**काश्मीरी स्पंद** '' शास्त्राने बांधली आहे. **(Doctrine of Vibrations)** पण, मानवी भाषा ही मानवाच्या मर्यादित शक्तीच्या बुद्धी, मन, इंद्रिये व शरीर यावर आधारलेली आहे. ह्या मर्यादामुळे मानवाला त्याच्या पूर्वज ऋषीमुनींवर यांनी किंवा प्रत्यक्ष देवांनी, विश्व निर्मात्यांनी जी 'भाषा' प्रदान केली आहे व जिच्यामध्ये हे '**विश्वसंवाद**' बांधले आहेत, ती अवगत नाही. समजत नाही!!

तेव्हा मध्ये एक 'Interpreter, Translator Module' (रूपांतर, भाषांतराचे माध्यम) आवश्यक आहे.

ते मानवी मनाच्या मानसशास्त्रीय. रचना व यंत्रावर system model वर आधारलेले असावयास हवे. त्याला त्यामुळेच symbols चा उपयोग आवश्यक ठरला. **स्वामी डॉ. सत्यप्रकाश सरस्वती (स्वामी दयानंद, आर्य समाज)** हे दयानंदाच्या तत्त्वज्ञानावर टीका करताना लिहितात.

"He (Dayanand) carefully ignored the Vedic, the Brahmanic and the upnishadic and logy in one important aspect. This I have called in my writings the <u>Samhita-tarka</u> (<u>संहिता तर्क)</u> or the '<u>Rupak-tarka</u>' <u>(रूपक तर्क)</u> or the argreement of '<u>Collative parallelisim</u>'. The old group of the vedic Rishis was very fond of this type of logic, which has its origin in the vedic Texts."

"स्वामी दयानंद यांनी वैदिक, उपनिषदिक, ब्राह्मणादिक संहितमधील किंवा विचारांतील एका समधर्म पण महत्वाच्या मुद्याचा काळजीपूर्वक उल्लेख केला होता. त्याला मी माझ्या लिखाणात 'संहितातर्क' असा किंवा 'रूपक तर्क' किंवा 'समांतर अनुषंगिकता' असा विचार मांडला होता. वेदकालातील एका विशिष्ट ऋषींचा गट, ह्या विचार पद्धतीचा आग्रहाने पाठ पुरावा व मांडणी करीत असे. ह्या तऱ्हेच्या तर्क पद्धतीचा वापर करीत असे. आणि त्याचा संदर्भही व उगमही व वेदाच्या संहितेतच सापडतो."

## <u>'Forms' व मानसिक व्यूह</u>

माझ्या मते हा सर्व विचार फार महत्त्वाचा आहे. याचे एक कारण म्हणजे आपण चर्चा करत असलेल्या मानवी मनातील अंतर्रचना व व्यूह आणि निसर्ग निर्मितीपासून अस्तित्वात असलेल्या काही नैसर्गिक व्यूह रचना ह्यामध्ये साधर्म्य व अंतर्गत नातेसंबंध ह्यांचा उपासनेत, साधनेत केलेला अत्यंत हुशारीचा, चातुर्याचा असा, प्रयोग या उपयोग. होय!!

डॉ. सत्यप्रकाश ह्यासांठी --------- उपनिषदार्तील ५ 'सेटचा' उल्लेख करताता.

<u>व्याहृती</u> :- भूः, भूवः, स्वः, आणि महः (४)

**आधिलोक:-** पृथ्वी, अंतराळ, द्यौः, आदित्य (४)

**आधिज्यातिश:-** अग्नि, वायु, आदित्य आणि चंद्रमा (४)

**आधिविद्या:-** ऋग, यजुः, सोम, ब्रह्म (४)

**आध्यात्म:-** प्राण, अपान, व्यान आणि अन्न (४)

तै.उ. (I-5, I-3)

विद्यानिर्मीती चैतन्यशक्ती आणि Forms

हे सेटस् कसले आहेत? हे चैतन्यशक्ती-ब्रह्मशक्तिने निर्माण केलेले अनंत forms (रूपे, Symbols) ची वर्गवारी आहे. मला या प्रश्नांचे सयुक्तिक उत्तर एका विलक्षण लेखकाकडून मिळाले "तैतरीय उपनिषद" हे इंग्रजी पुस्तक, <u>श्री. एच्. एन. रामस्वामी</u>, इलेक्ट्रिकल इंजिनिअर यांनी लिहीले आहे. भारतीय विद्या भवन ह्या संस्थेने प्रसिद्ध केले (१९८५)आणि त्याला प्रस्तावना डॉ. करण सिंग यांची आहे.

ह्या लेखकाचे मुख्य म्हणणे काय आहे?

विश्वातील अदृश्य अशी Life Energy चेतन्यशक्ती ज्या पद्धतीने 'Forms' निरनिराळ्या जड व चैतन्यपूर्ण अशा रुपांना निर्माण करते. त्या रुप, forms आणि Symbols ना नियंत्रण व कार्यप्रवण करण्याचे नियम व यंत्रणा 'तैतरीय उपनिषद 'शिक्षा वल्ली' मध्ये सांगत आहे.

उपनिषदातील संकल्पना ज्या तात्कालीक व समकालीन शब्दामध्ये निबध्द केल्या आहेत, त्यांना आजच्या नवीन 'मॉडर्न' भाषेमध्ये रुपांतर केल्याखेरीज खरा बोध होणार नाही. विश्वाच्या निर्मातीची मूळ चैतन्यशक्ती हीच ह्या विश्वातील अनेक Forms, symbols, reality यांना जन्म देते. ह्याचे विस्तृत भाष्य ह्या पुस्तकांत आहे. आता या त्रोटक भूमिकेवर तृतीय शिक्षा वल्ली अध्यायातील नमूना दाखल एक भाष्यांतर बघू या. तुम्ही मग ह्यांचेच पारंपारिक पद्धतीने केलेले अर्थ वाचा व फरक लक्षात

येईल. भाषेच्या मर्यादामुळे खरी अर्थप्राप्ती होण्यांत अडचण येते, हे लक्षात येईल.

**सहनौ यशः । सह नौ ब्रह्मवर्चसम ॥ अथातः संहितया उपनिषदं व्याख्या स्यामः ॥ पंचस्वधिरत्णेषु ॥**

**अधिलोकमधिज्यौतिषमधिविद्यमधिप्रजमध्यात्मम् । ता महासंहिता इत्याचक्षते ।**

त्रै. उपनिषद, ३ रा अनुवाक 'शिक्षणावल्ली'

इंग्रजी भाषांतर असे

Let us together attain to peak (of Experience) Let us experience the life energy in space together only they we will be able to express the secret of "Existential Balance' (Samhita, संहिता) forms. Supporting awareness of forms, Supporting knowledge (resulting from such an awareness), supporting the essence (of both the original and multiplied forms). These they call the Great Balancing feats ( in Existence)

The Samhitas (संहिता संच) denote the existential balance of ""Energies of Thought" Thought energies being energy states in pure form do not know a moment of stability. How are then the universal forms to endure in appearance? It is by the existential balance of energies. surrounding all round the form from outside the thought energy inside the forms,. Such that exactly at the form, there is a balance, that sustains the appearance of the form. The moment this balance is disturbed, the form changes its appearance to take out a new form of "dynamic Stability'.

Therefore there is only change of one form to another. There is no death in reality, but only change of forms so fast that all appearances to the ego, the form appears to vanish, vanish from objectivity. If the ego is sufficiently awakened in consciousness, as it was in the case of "Rishis', even this process of transformations of forms can be seen, as clearly as a movie camera can capture different displacements of a moving object.

ह्या छोट्या लेखात एवढा मूलगामी, गूढ विषय हाताळणे अशक्यच आहे. पण, भौतिकवादी व वैदिक अध्यात्मवादी ( स्पिरीच्यूअल) दृष्टिकोनातील फरक लक्षात येण्यासाठी ही मी प्राथमिक मांडणी केली आहे. भारतीय स्पिरीच्युअल विचार पद्धतीत अजूनही पुष्कळ सांगावयाचे आहे ते पुढील लेखात जरूर प्रयत्न करावयाचा मानस आहे.

पण, विश्वाच्या निर्मितीत जे 'चैतन्य फॉर्मस्' निर्माण होतात, त्यांना रंग, रूप, अहंभाव, मर्यादा, स्वसंवेद्यता (स्वजाणीव), स्वतःच्या फॉर्मचे आधीक नकल फॉर्मस करण्याची क्षमता, वेगवेगळ्या फॉर्मशी संवाद साधण्याची इच्छा व मर्यादीत क्षमता, ह्या बंदिस्त फॉर्मच्या बाहेर Becoming, Transcendence करण्याची क्षमता आहे. याचे दर्शन घडेल.

प्रत्येक फॉर्म मग भले ते जिवंत, निर्जीव असे असले तरी त्यांच्याभोवती भावनांचे, इतिहासाचे, उद्दीष्टांचे व इतर संच व पुंजळे जोडलेले असतात. अदृश्य असतात. दृश्य पण असतात, पण प्रत्येक जीवात्म्याला त्या त्या symbols शी स्वतःचे एक असे वलय वा आकृतीबंध असतो. ह्या वेगळेपणावर संवाद वा विसंवाद अवलंबून असतात. ह्या विशिष्ट पुंजक्यांची बैठक सांस्कृतिक, जैविक, आर्थिक, सामाजिक, आध्यात्मिक, धार्मिक अश्या अनंत विषयांवर आधारलेली असते. त्यांतूनच

भयानक संघर्ष घडू शकतो.

**पुढील लेख**

मग, ह्या रचनेचा वैश्विक हेतू कोणता? आणि या रचनेचे Maintencance किंवा Harmonisations वैश्विक शक्ति कशा करतात हे पुढील लेखात पाहू या.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,
अम्यारी लेन, ठाणे - ४०० ६०१.
Tel. : 2536 84 50
Email : yrsane@eth.net

□□□

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञात क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

VIDYA PRASARAK MANDAL'S
K. G. JOSHI COLLEGE OF ARTS &
N. G. BEDEKAR COLLEGE OF COMMERCE
THANE

TWO DAY NATIONAL SEMINAR
ON

**Indian Philosophy: Its Relevance in the 21st Century**

On 18th & 19th January, 2008

*Venue*

Thorale Bajirao Peshawe Sabhagruha,
"Jnanadweepa", Thane College Campus,
Chendani Bunder Road,
Thane 400 601, (MS), India.

*Organized by*

V.P.M's Joshi-Bedekar College
"Jnanadweepa", Thane College Campus,
Thane 400 601, (MS), India.
Email :vpm_joshibedekar_office@yahoo.co.in
nbarse@gmail.com &
mensanamonographs@yahoo.co.uk
Website : www.vpmthane.org

OUR VISION :
FROM INFORMATION TO KNOWLEDGE TO WISDOM

# ब्रह्मचर्य - एक वरेण्य तत्त्व

*ब्रह्मचर्य म्हणजे नेमके काय याबाबत अनेक विद्वानांच्या अनुभवाधारित काही कल्पना असतात. त्यातील वरेण्य तत्त्वाबद्दल ही माहिती.* - संपादकीय

## रतिभावना व ब्रह्मचर्य

कविवर्य बा. भ. बोरकर यांनी सांगितलेली एक गोष्ट वाचत होतो. काका कालेलकर आणि विनोबाजी या दोघांना बोरकर आधुनिक दर्शनकार म्हणून मानत. पण या दोघांच्याही विपुल साहित्यात रतिभावनेचा परामर्श घेतलेला बोरकरांना कुठेही आढळला नव्हता. विनोबा हे बालब्रह्मचारी. त्यांनी रतिभावनेचा विचार टाळला हे बोरकर समजू शकले. पण काकांसारख्या गृहस्थाश्रमी माणसाने ही रतिभावना का टाळावी हा बोरकरांना प्रश्न पडला. अखेर त्यांनी काकांना तसा सरळ सवाल केला. त्यावर काकांनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक व विचारप्रवर्तक होतं. काका म्हणाले, ''शृंगार हा रसराज आहे. ब्रह्मचर्याची साधना पूर्ण झाल्याशिवाय त्याला स्पर्श करणं जितकं धाष्ट्यांचं तितकंच धोक्याचंही आहे. माझी ती साधना अजून पूर्ण झालेली नाही.''

काकांच्या या उत्तरानं बोरकर अंतर्मुख झाले. शृंगार हाताळताना भले भले कसे चकतात आणि चुकतात, त्याचे दाखले त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले. आणि त्याचबरोबर कालिदास, रवीन्द्रनाथांसारख्यांना तो समर्थपणे का पेलता आला त्याचं रहस्यही उमगलं. आणि शृंगारातून भोगानंद शोधणारा रसानंदाला कसा आचवतो तेही ध्यानांत आलं.

कविवर्यांना त्यांच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं.



कालिदास

## भारतीय संस्कृती व शृंगार रस



शृंगार

शृंगार रसाचा वापर कोणी करावा, कसा करावा,

कोणी टाळावा व का ते स्पष्ट झालं. पण माझ्या मनात मात्र अनेक विचारांची मालिका निर्माण झाली. केवळ साहित्यच नव्हे तर कोणत्याही कलाकृतीची निर्मिती जेव्हा संयमाच्या पायावर उभी राहते. तेव्हा तिला एक अतुलनीय सामर्थ्य प्राप्त होतं. संयम हा तर भारतीय संस्कृतीचा आत्मा. साऱ्या चराचर सृष्टींत भारतीय संस्कृतीने आपली जीवन साफल्याची प्रतीकं शोधली. शंकराच्या मंदिरातील कासव हे संयमाच प्रतीक. त्याला वंदन करायचं ते तो संयम आपल्याही अंगी बाणावा म्हणून. नदी जोपर्यंत दोन्ही बाजूस तटांनी सीमित असते तोपर्यंत तो आपल्या ध्येयाकडे वेगांत धाव घेऊ शकते. पण जेव्हा ते तट कोसळतात तेव्हा नदीचा प्रसार जरूर होतो पण ध्येयाकडे जाण्याचा तिचा वेग मंदावतो, ती इतस्ततः भरकटते हे ध्यानात घ्यायला हवं.

परंतु संयमाचा हा विचार येण्यापूर्वी निर्मितीचा हेतू महत्त्वाचा आहे. एखादा चित्रकार एखादं सुंदर दृश्य पाहतो. त्यानं त्याचा अंतरात्मा आनंदित होतो आणि मग तो आनंद इतरांनाही मिळावा या भावनेन तो सुंदर चित्र रेखाटतो. एखादा कवी समाजातलं दुःख अनुभवतो. त्यानं त्याचं हृदय पिळवटून जातं आणि मग एखाद्या सुंदर काव्याची निर्मिती होते.



अमृत खेचून

या विचाराबरोबर माझ्या डोळ्यासमोर कविवर्य बोरकरांच्या **"अमृत खेचून आणू भूवरि"** या काव्यातील खालील पंक्ती उभ्या राहिल्या.

**"गड्या तुझ्यापरि मीही प्यालो सूर्याची आग**
**परि दर्यापरि आहे वाहे अपुला अनुराग"**

या कवितेतून बोरकरांचे चंद्राशी असलेले सख्य कळलं, त्या दोघांमधील एका साम्याचा उलगडा झाला. कवी, काव्यनिर्मिती, जीवनातील सुखदुःख यांचा आंतरिक संबंध समजू लागला. बोरकर म्हणतात की, सूर्याच्या प्रखरतेचा दाह चंद्र आनंदाने स्वीकारतो पण आपल्याला मात्र तो मंद प्रकाश आणि शीतलता देतो. त्याप्रमाणे कवी सुद्धा जीवनातील दुःख, क्लेश यांचा अनुभव घेतो पण त्यांच्या काव्यकिरणांतून तो समाजास मात्र आनंदच देत असतो. शिवाय यांचा आदर्श प्रत्यक्ष शिवशंकर, ज्यानं हलाहल पचवलं पण आपणांस गंगेच्या रूपानं शीतल, पवित्र अस जल-जीवन दिलं. हाच भारतीय संस्कृतीनं, विचारधारेनं, साहित्य काव्य निर्मितीसाठी ठेवलेला महान आदर्श. महर्षी वाल्मिकींच्या उगमापासून चालत आलेला, कालिदास रवींद्रनाथ यासारख्यांनी जपलेला महान वारसा.

परंतु अशा प्रकारच्या संयमातून दर्जेदार निर्मिती साधावयाची असेल तर त्यासाठी काकासाहेब कालेलकरांनी म्हटल्याप्रमाणे ब्रह्मचर्याची साधना करून मानसिक सामर्थ्य प्राप्त करणं अनिवार्य ठरतं.

## ब्रह्मचर्य म्हणजे काय?

पण आता ब्रह्मचर्य म्हणजे तरी काय? आज तर आपण अनेक शब्दांचे अर्थही चुकीचे लावतो. कोणत्याही अविवाहीत व्यक्तीस 'ब्रह्मचारी' म्हणून संबोधलं जातं. ८ व्या वर्षी उपनयन झाल्यावर गुरुगृही जाऊन अध्ययन करण्याच्या सुमारे १२ वर्षांच्या कालावधीस ब्रह्मचर्याश्रम असं मानलं जाई. पण केवळ अध्ययन करणाऱ्यास ब्रह्मचारी

मानता येईल का?

त्या काळातील शिक्षणपद्धतीकडे नजर टाकल्यास आपल्याला, असं आढळतं की गुरूगृहांत शिक्षण पूर्ण झाल्यावर 'समावर्तन विधि' म्हणजेच दिक्षांत समारंभ होत असे. ज्यानं वेदाध्ययन केलं आहे पण व्रताचरण केलं नाही अशा विद्यार्थ्यास 'विद्यास्नातक' अशी पदवी प्राप्त होत असे. तर ज्यानं वेदाध्ययन आणि व्रताचरण दोन्ही केलं असेल त्या विद्यार्थ्यास 'विद्याव्रतस्नातक' अशी पदवी प्राप्त होत असे. यावरून अध्ययनाबरोबरच व्रताचरणही करणाऱ्यास श्रेष्ठ मानलं जात असे, असं दिसून येतं. पण मग अशा प्रकारची ब्रह्मचर्याची साधना करण्याचा आग्रह का धरला असावा? त्यांतून कोणती वैयक्तिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगती साधली गेली?

## भारतीय संस्कृतीचा अलौकिक वारसा

या अखेरच्या प्रश्नानं आपल्या डोळ्यासमोर एक दैदीप्यमान असा कालखंड उभा राहतो. संस्कृतीचा एक महान आदर्श निर्माण करून हजारो वर्षे समाजाला प्रगतिपथावर ठेवणारी रामायण, महाभारतासारखी महाकाव्यं, मानवी जीवन, त्याचा उद्देश, विश्वाशी असणारा त्याचा अतूट संबंध यांच अवलोकन करत आखिल विश्वाचं गूढ उकलून दाखवणारे आणि हजारो वर्षानंतर आजही प्रमाण मानले जाणारे वेद उपनिषदे यांसारखे ग्रंथ; भरतमुनींनी निर्माण केलेलं नाट्यशास्त्र, शास्त्रीय संगीताची महान परंपरा, कालिदास, भवभूती, माघ वगैरेंनी केलेल्या दर्जेदार रचना, विविध लेण्यांतून आणि बौद्ध विहारातून आढळणारी शिल्पकला, नैसर्गिक रंगांनी साकारलेली आणि आजही टिकून असणारी पेंटिंग्ज, याशिवाय गणितशास्त्र, न्यायदानपद्धती, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादी विषयांत साधलेली प्रगती. आजही आपणासं स्तिमित करते. प्रत्येक व्यक्तिमात्रानं आणि समाजानं केलेली ही प्रगती कोणत्या मूलभूत तत्त्वावर अथवा पायाभूत विचारसरणीवर केली असावी?

## विशेष शिक्षण पद्धती

आश्रम-शाळातून दिल्या गेलेल्या केवळ बाह्य शिक्षणामुळे ही प्रगती साधली गेली नाही. कारण केवळ माहितीजन्य ज्ञान हे अलौकिक बुद्धिमत्तेचा पाया असूच शकत नाही. महायोगी श्रीअरविंद म्हणतात, ''शरीर, मन व आत्मा यांना एका अत्यंत शिस्तबद्ध अशा शिक्षण पद्धतीनं विकसित करून उच्चपातळीवर नेल्याशिवाय अशी प्रगती अशक्य आहे.'' स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती निर्णय क्षमता, आकलन, तर्कशास्त्र, युक्तिवाद आणि निर्मिती क्षमता या मनाच्या व बुद्धीच्या निसर्गदत्त शक्तीची जोड लागेल. ही शक्ती कशी प्राप्त होणार?

मानव हा काही या पृथ्वीतलावर अधिराज्य गाजवणारा स्वतंत्र घटक नाही. तो या निसर्गाचा आणि पर्यायाने विश्वाचा एक घटक आहे. याची पूर्ण जाणीव प्राचीन ऋषी-मुनींना होती. त्याचबरोबर या वैश्विक शक्तीचा अंश सूक्ष्म रूपानं प्रत्येक घटकामध्ये, प्रत्येक मानवामध्ये वास करतो याचीही त्यांना जाणीव होती. एखाद्या विशिष्ट प्रक्रियेने मानवामध्ये सूक्ष्म रूपानं वसणाऱ्या या शक्तीस जागृत करून तिला वैश्विक शक्तीशी जोडून दिल्यास एक अनन्यसाधारण असा शक्तीचा स्रोत मानवाला उपलब्ध होऊ शकेल हेही स्पष्ट जाणवत होतं. हा शक्तीचा स्रोत जितका अधिक सक्षम करता येईल त्या प्रमाणांत अलौकिक बुद्धीमत्ता व अजोड निर्मितीक्षमता प्राप्त करून घेता येईल. या निर्णयाप्रत आलेल्या ऋषीमुनींनी हे साध्य करण्यासाठी ज्या विविध प्रक्रियांचा अवलंब केला त्यातील ब्रह्मचर्यपालन ही एक महत्त्वाची प्रक्रिया होती.

## महायोगी अरविंद घोष

यावर भाष्य करताना महायोगी श्रीअरविंद म्हणतात, ''The Source of life and energy is spriritual and not material'' परंतु ज्या पायावर ते जीवन आणि ती प्राणशक्ती उभी असते तो पाया मात्र भौतिक असतो. प्राचीन ऋषी मुनींनी 'कारण्य' आणि 'प्रतिष्ठा' यातील भेद जाणला होता. जड पदार्थ ही 'प्रतिष्ठा' आणि 'ब्रह्म' हे 'कारण्य', जीवाचे दक्षिण व उत्तर ध्रुव. श्री अरविंद म्हणतात, ''To raise up the physical to spriritual is Brajmacharya''. कारण हे उत्तर व दक्षिण ध्रुव जेव्हां एकमेकांशी जोडले जातात तेव्हा एकातून निर्माण होणारा शक्तीचा स्रोत दुसऱ्याला प्राप्त होतो.

या संपूर्ण प्रक्रियेचं वर्णन करताना श्रीअरविंद म्हणतात, ''या प्रक्रियेतील मूलभूत भौतिक एकक 'रेत' हे होय. मानवी शरीरात असणारी उष्णता, प्रकाश व विद्युत या रेतामध्ये सुप्तरूपाने असतात. रेतसंख्या वाढू लागली की प्रथम उष्णता निर्माण होते व ही उष्णता संपुर्ण शरीर प्रणालीला उत्तेजित करते व त्यातून प्रथम 'तेजस्विता' निर्माण होते. हे तेज, प्रकाश हाच सर्व ज्ञानाचा उगम. आणि नंतर त्याचे रूपांतर 'विद्युत' मध्ये होते. सर्व प्रकारच्या शारीरिक आणि बौद्धीक क्रीयाशीलतेचा हा पाया असतो. या 'विद्युत' मध्येच 'ओजस' अथवा प्राणशक्तीचाही अंतर्भाव असतो. अशा तऱ्हेने, ''The retas refining from jala to tapas, tejas, ridut and ojas fills the system with physical strength energy and brain power.

या प्रक्रियेतून शारीरिक आणि बौद्धिक शक्ती प्राप्त होते असे श्रीअरविंद म्हणतात. याच प्रक्रियेला 'उर्ध्वरेत' होणं असंही म्हटलं जातं. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार अफगाणिस्तानमध्ये आजही 'उर्ध्वरेत' गणेशाची मूर्ती अस्तित्वात आहे. उर्ध्वरेत प्रक्रियेचा एक आदर्श व त्याचे प्रतीक म्हणून ही मूर्ती स्थापन केली असावी.

## उरू-ज्योती


श्री वासुदेवशरण अग्रवाल, प्राध्यापक, हिंदु विश्व विद्यालय यांनी सुमारे ७० वर्षांपूर्वी ''उरू-ज्योती : वैदिक अध्यात्म सुधा'' हा आध्यात्मिक निबंधाचा संग्रह प्रसिद्ध केला होता त्यांत ते म्हणतात, '' जब मनुष्य विधीपूर्वक आहार-विहार और प्राणायाम के द्वारा उर्ध्वरेत बनने लगता है, उस समय समस्त सूक्ष्मातिसूक्ष्म रसोंका प्रवाह ब्रह्मांड या मस्तिष्क को ओर जाता है। आर्य संस्कृतिमें सबसे अधिक वरेण्य तत्त्व ब्रह्मचर्य है।''

याच संदर्भात ''वाजपेयी'' या एका परिवारास प्राप्त झालेल्या नावाबद्दल या पुस्तकांत केलेल भाष्य महत्त्वपूर्ण आहे. आपले पूर्व पंतप्रधान श्रीअटलविहारी वाजपेयी सर्वांनाच ज्ञात आहेत. या आडनावांत कोणते पेय अथवा त्याची प्राशन क्रिया अभिप्रेत आहे? 'वाजपेय' नावाचा यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणांना वाजपेयी म्हणतात हा सर्वसाधारण समज. पण मग हा यज्ञ कोणता? सर्वसाधारण समज असलेला बाह्य स्वरूपातील की मानसिक प्रक्रियेतील यज्ञ?

गीतेवरील निबंधामध्ये महायोगी श्रीअरविंद म्हणतात, ''यज्ञ आदी शब्द गीतेने प्रतीकात्मक दृष्टीने वापरले आहेत. गीतेला जो यज्ञ अभिप्रेत आहे त्याचे स्वरूप मानसिक आहे. यज्ञाचा अग्नि भौतिक ज्वाला नव्हे तर ब्रह्माग्नि आहे. यज्ञाच्या विविध प्रकारांत कनिष्ठ, वरिष्ठ अशी श्रेणी आहे. सर्वांत कनिष्ठ द्रव्ययज्ञ तर सर्वांत श्रेष्ठ ज्ञानयज्ञ'' आपल्या आतापर्यंतच्या विवेचनाच्या अनुषंगाने यज्ञ या शब्दाचा निम्न स्तरावरील पारंपारिक, रूढ, व बाह्य स्वरूपी अर्थ दूर सारून आध्यात्मिक अर्थालाच प्राधान्य देणे योग्य ठरेल. आणि म्हणून वाजपेय यज्ञाचाही विचार याच दृष्टिकोनांतून करणे आवश्यक आहे.

श्री. वासुदेव शरण अग्रवाल उरुज्योति या ग्रंथात म्हणतात, ''अध्यात्म वाजपेय उस कृत्यका नाम है जिसमे मनुष्य 'वाज' को अपना पेय कल्पित करता है। किशोरावस्थाके आरम्भमें देह के भीतर एक विलक्षण प्रकारका रस बनने लगता है। इसी का नाम वीर्य है, और इसे ही 'वाज' भी कहते है। वीर्यं वै वाजः (शतपथ ब्राह्मण) जिसे भीतर ही भीतर पचानेका नाम 'वाङजपान' है। प्रत्येक ब्रह्मचारीको 'वाजपेयी' होना चाहिये । पिया हुआ वाज, अमृत बनकर अमरपन देता है, शरीरके प्रत्येक घटक कोश में अमृत बहने लगता हैं। उनकी चेतना असीम हो जाती हैं।''

साधना व साहित्य निर्मिती



शृंगार व साधना

अशा तऱ्हेने, शृंगार रसाचा वापर करण्यापूर्वी ब्रह्मचर्याची साधना पूर्ण होणे आवश्यक आहे या काकासाहेब कालेलकरांच्या उत्तरानं माझ्या मनांत निर्माण झालेल्या विचार मालिकेनं एक वर्तुळ पूर्ण केलं होतं. एखाद्या साहित्यकृतांची निर्मिती करताना मनाला लगाम घालण्यासाठी मानसिक ताकद कमावणं आवश्यक होतं आणि त्यासाठी ब्रह्मचर्याची साधना केली जात असे हे समजलं. या साधनेनं मानवाच्या शरीरात अनाकलनीय असे बदल घडून येतात. शारीरिक आणि बौद्धिक सामर्थ्य प्राप्त होतं. ज्यायोगे व्यक्तिमात्राला आणि साऱ्या समाजाला आपला सर्वांगिण विकास साधता येतो. प्राचीन काळी या साधनेला, सत्वगुणाचा विकास आणि योगसाधना यांचीही जोड दिली गेली व त्यांतूनच आपल्या महान संस्कृतीचा आदर्श निर्माण झाला. महायोगी श्रीअरविंदांच्या शब्दात सांगायचं तर, ''Brahmachrya and Satwik development - created the brain of Ancient - India and was perfected by Yoga Sadhana.''

नरेन्द्र नाडकर्णी

सीडी - १०१, सी -१
श्रीरंग सोसायटी, ठाणे
टे. न. २५३३३१६०
E.mail : nd_nadkarni@yahoo.com

•••

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

### उपक्रम

१) भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
२) दिशा व्यासपीठ
३) डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
४) विद्या प्रसारक मंडळ - वर्धापन दिन
५) नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
६) ५ सप्टेंबर - दीक्षांत समारंभ

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

परमनंट चित्रकला स्पर्धा - २००६ चा निकाल :-

पुरस्काराचे स्वरुप गोल्डमेडल, सिल्व्हर मेडल व ब्रॉंझ मेडल तसेच उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रक असे आहे.

१) कु. यश शेजवळ - गोल्ड मेडल
२) कु. आदिती सिनलकर - सिल्व्हर मेडल
३) कु. सागर पवार - ब्रॉंझ मेडल

व ९ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके मिळाली.

१) अमिषा अरुण भोसले
२) आकांक्षा गुंडूराव गावडे
३) शुभम् श्रीधर धाडवे
४) नेहा गणेश लोखंडे
५) अद्वैत मंगेश वाजे
६) साईराज संजय गिरधर
७) स्मृती संजय सावंत
८) सौरभ अशोक पाटील
९) उत्कर्षा रत्नाकर कुपटे

वरील सर्व विद्यार्थ्यांना १ रंगपेटी सुद्धा देण्यात आली.

कला चिल्ड्रन अॅकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धेत कु. ऋषिकेश जनार्दन महाडीक - गुलाब गट - मोठा शिशु ह्या विद्यार्थ्यास उत्कृष्ट हस्ताक्षराबद्दल बक्षिस देऊन 'बालगौरव पुरस्कार' म्हणून सन्मानित करण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

मार्च २००७ ची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलांचे यश

एकूण विद्यार्थी - १९०

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - १९०

उत्तीर्ण विद्यार्थी - १९०

टक्केवारी - १००%

९० टक्के व जास्त २४

८० ते ९० = ७९

७० ते ८० = ४७

६० ते ७० = ३४

५० ते ६० = ०६

४५ पेक्षा कमी = ००

१९०

| गुणानुक्रमे पहिले दहा | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. तनुज नावर | ६०७ | ९३.३८ |
| २. अक्षता प्रभू | ६०२ | ९२.६१ |
| ३. सर्वेश पडाळकर | ६०० | ९२.३० |
| ३. आनंदकुमार सिंग | ६०० | ९२.३० |
| ४. प्राची जोशी | ५९९ | ९२.१५ |
| ४. दीपिका ताम्हणकर | ५९९ | ९२.१५ |
| ५. संकेत खांबेटे | ५९४ | ९१.३८ |

| | | |
|---|---|---|
| ५. तेजश्री श्रृंगारपुरे | ५९४ | ९९.३८ |
| ६. प्रणव पटवर्धन | ५९२ | ९९.०७ |
| ७. शर्वरी सातपे | ५९० | ९०.७६ |
| ७. स्नेहा धर्माधिकारी | ५९० | ९०.७६ |
| ७. अक्षय ओक | ५९० | ९०.७६ |
| ७. अभिषेक शिंदे | ५९० | ९०.७६ |
| ८. माधुरी साखळकर | ५८९ | ९०.६१ |
| ८. राधिका कुलकर्णी | ५८९ | ९०.६१ |
| ९. अदित्य कानविंदे | ५८८ | ९०.४६ |
| ९. आनंद उर्सेकर | ५८८ | ९०.४६ |
| ९. मिहीर वैद्य | ५८८ | ९०.४६ |
| ९. निखिल राजे | ५८८ | ९०.४६ |
| १०. करीश्मा जयवंत | ५८७ | ९०.३० |
| १०. सलिल कर्णिक | ५८७ | ९०.३० |

## विषयवार सर्वाधिक गुण

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | सर्वेश पडाळकर | ८३ |
| संस्कृत | किंजल गाला | ९८ |
| | अभिजीत करंदिकर | ९८ |
| | प्रणव पटवर्धन | ९८ |
| | निकिता कलघटगी | ९८ |
| | सलिल कर्णिक | ९८ |
| | तनुज नाबर | ९८ |
| | रिचा टिपणीस | ९८ |
| | अक्षता प्रभू | ९८ |
| | आनंदकुमार सिंग | ९८ |
| | आनंद उर्सेकर | ९८ |
| | संकेत खावेटे | ९८ |
| | स्नेहा धर्माधिकारी | ९८ |
| | प्राची जोशी | ९८ |
| हिंदी | अपूर्व तटकरे | ८४ |
| | भावना जाधव | ८४ |
| | हिरेंद्र शेळके | ८४ |
| मराठी | तनुज नाबर | ८७ |
| | सानिका नातु | ८७ |
| गणित | वृतिक निसार | १४९ |
| विज्ञान | दीपिका ताम्हणकर | १०० |
| समाजशास्त्र | प्रणव पटवर्धन | ९८ |
| | तनुज नाबर | ९८ |
| | तेजश्री श्रृंगारपुरे | ९८ |

## महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल

इ. ९ वी व ८ वी तील शालेतील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा एप्रिल २००७ साठी उत्तम गुणांनी पास होऊन निवड झाली.

| | नाव | इयत्ता | |
|---|---|---|---|
| १. | ओजस गोहाड | राज्यात ४ थी | ९वी |
| २. | रुचा कारखानिस | राज्यात १८ वी | ९वी |
| ३. | विराज संघवी | राज्यात २२ वी | ९वी |
| ४. | वृतिका शाह | जिल्ह्यात ३ री | ९वी |
| ५. | अश्विनी पावगी | जिल्ह्यात ८ वी | ९वी |
| ६. | क्षितीजा जाधव | जिल्ह्यात ५ वी | ८वी |
| ७. | आदित्य रानडे | जिल्ह्यात ५ वी | ८वी |

## माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल

फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ५१ विद्यार्थी बसले होते. त्यातील ६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे -

१) वृपाली प्रसादे - ४ थी
२) कृणाल चौधरी - २५ वी
३) आश्लेषा पोटदुखे - २९ वी
४) अदिती देशपांडे - ३३ वी
५) अनुराग गांगल - ३९ वा
६) पुष्कर वेलणकर - ४० वा

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल

१) फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ८७ विद्यार्थी बसले होते. सर्व उत्तीर्ण झाले व त्यातील ४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे

१. कु. परीता डनोले - ८ वी
२. कु. इशा सामंत - ९ वी
३. कुमार सन्मय आगरकर - १० वा
४. कु. रुतुजा धनावडे - ११ वी

२) कु. परीता डनोले हि ''नॅशनल टॅलेन्ट सर्च'' ह्या परीक्षेत मुंबईतून ३ री आली आहे.

## एप्रिल २००७ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल

| इ. | परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | निकाल उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | १२ | १२ |
| ६ वी | १५ | १५ |
| ७ वी | १३ | १२ |

## सर्वाधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | नेहा पुसाळकर | ८८ |
| ६ वी | हर्षाली भोसले | ८६ |
| ७ वी | कृणाल चौधरी | ८६ |

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

- बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या **श्री. प्रकाश संतोष माळी** यांना नवजीवन ग्रामविकास प्रतिष्ठान, वेल्हाळे अहमदनगर यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार २००७ या पुरस्काराने गौरवण्यात आले.

  तसेच त्यांना महाराष्ट्र पत्रकार संघातर्फे शिक्षणरत्न असे प्रशस्तिपत्र देण्यात आले.

- महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका **सौ. के. डी. फळ** यांनी मुंबई विद्यापीठातर्फे पी.एच.डी पदवी पूर्ण केली.

- महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख **श्री. अभिजीत काळे** हे इंडस्ट्री ॲकेडेमिया इंटरफेस मीट ऑफ आय. टी आणि कंप्युटर सायन्स कॉलेजेस ऑफ मुंबई युनिव्हर्सिटी ॲंड आय. टी. कॉर्पोरेटस यासाठी एम्व्हेसी हॉल रंगशारदा बांद्रा येथे दिनांक ०४ जून २००७ ला उपस्थित होते.

- **श्रीमती नयना राउत** यांनी **प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर** यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठातून पी. एच. डी. पदवी पूर्ण केली.

- **कु. संपदा ताडफळे** यांनी **प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर** याच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठातून **एम.एस.सी पदवी** पूर्ण केली.

- **श्री. अमोल पटवर्धन** यांनी **डॉ. श्री. आर.**

पी. आठल्ये यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठातून **पी.एच.डी. पदवी** पूर्ण केली.

- **कु. राणी सिंग** ही AU/ISHS यांनी २९ एप्रिल ते ०४ मे २००७ आयोजित केलेल्या इंटरनॅशनल मेडिसीनल अँड अॅरोमेटीक प्लांटस कॉन्फरन्स ऑन कलनरी हर्बस या परिषदेला उपस्थित होती.

- महाविद्यालयाच्या शिक्षकेतर सहकाऱ्यांपैकी **श्री. आर. टी. मिसाळ, श्री. एस. डी. सोमण व श्रीमती नेहा सावंत** हे बिर्ला महाविद्यालय कल्याण यांनी आयोजित केलेल्या अॅडमिनीस्ट्रेटिव्ह कॉलेज या एक दिवसाच्या शिबिराला उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या बारावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी - | ५०० | |
| उत्तीर्ण विद्यार्थी जुने व नवीन- | ४५२ | ९०.४०% |
| उत्तीर्ण विद्यार्थी नवीन - | ४४८ | ९५.५३% |
| विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी - | १४७ | २९.४०% |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी - | १८९ | ३७.८०% |
| द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी - | १०५ | २१.१०% |
| तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी - | ११ | २.२०% |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी - | ४८ | १०% |

महाविद्यालयातील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी

| नाव | एकूण | गुण % |
|---|---|---|
| आठवले दीप्ती अनिल | ५४४ | ९०.६६% |
| भिडे श्रुती श्रीकांत | ५३९ | ८९.८३% |
| चितळे संपदा संजय | ५३३ | ८८.८३% |

## संपादकीय

(मुखपृष्ठावरून)

### प्रवेश

लोकशाही संरचनेत अशा विद्यार्थ्यांची खर्चाची जबाबदारी शासनाने उचलावयाची असते. हा प्रश्न पुढे येताच नये, शासनाने त्यासाठी शिक्षण कर वाढवावा. पण चांगले, दर्जेदार शिक्षण देऊ इच्छिणाऱ्या, तशी क्षमता असणाऱ्या संस्थांच्या कामात व्यत्यय आणू नये.

अत्यंत अभिमान वाटावा अशी संगणकाधारित प्रवेश पद्धती विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्थांनी गतवर्षी यशस्वीपणे राबवली. काळानुरूप बदलत राहणे हा आमच्या संस्थेचा स्वभाव आहे. पालक व विद्यार्थी यांना प्रचंड रांगा लावायला लावून होणारी गैरसोय टाळावी, कागदाचा अपव्यय टाळावा या हेतूने आम्ही राबवलेली ही पद्धत यंदाही मंडळाच्या घटक संस्थांनी अंमलात आणली. काल सुसंगत बदल करण्याच्या या विक्रमातून यंदा २४००० हून अधिक अर्ज संगणकाच्या माध्यमातून स्वीकारले गेले. अर्थात पालक मानसिकता बदलत आहेत हे ही यावरून दिसते. अशीच मानसिकता इतर काही प्रश्नांबाबत बदलता आली तर शिक्षणाचा दर्जा अधिक सुधारेल.

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.